परस्परं भावयन्तः

म प्र

मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ७८ ✦ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✦ जून २००९

वेबसाईट : www.marathepratishthan.org ई-मेल : maratheparivar@yahoo.co.in

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे. (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय



प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा सप्रेमनमस्कार. मार्च हितगुजच्या अंकात, ९व्या अखिल भारतीय संमेलनाला (दुर्ग ग्राम, कार्कल तालुका) आपणा सर्वांना अुपस्थित राहाण्याचे आवाहन केले होते. दि. १ मे ते ३ मे असे तीन दिवस संमेलन होते. अेवढ्या थोड्या कालावधीत अनेकांना रेल्वे वा बसचे आरक्षण मिळणे शक्य नव्हते. त्यामुळे आपल्यापैकी बऱ्याचजणांना इच्छा असूनही संमेलनाला अुपस्थित राहाणे शक्य झाले नाही. तरीही 'हितगुज'चे जाहिरातदार आणि टूरवेजचे श्री. राजेश रानडे यांनी दुर्ग येथे संमेलनात जाण्याचे व पुढे कोस्टल कर्नाटक सहल करण्याची व्यवस्था केली. त्यामुळे आम्हा काहीजणांना संमेलनात सहभागी होता आले. (पृ.४ फोटो पाहावा.)

*(पृष्ठ २ वर)*

## अुपाध्यक्षांचे आवाहन

हितगुज हे आपल्या मराठे परिवाराचे मुखपत्र. दिवसेंदिवस एक दर्जेदार प्रकाशन म्हणून हितगुज नावारुपास येत आहे.

सभासदांनी सुमारे १८ वर्षापूर्वी दिलेल्या २०० रु. आजीवन वर्गणीचे व्याज, जाहिरातदार व सभासदांकडून वारंवार मिळणाऱ्या देणग्यांच्या बळावर आम्हाला सभासदांपर्यंत 'हितगुज' पोचवता आले.

महिलावर्ग, युवक व बालकांना हितगुजकडे व त्या माध्यमातून आपल्या प्रतिष्ठानाकडे आकर्षित करण्याच्या उद्देशाने त्यांना आवडतील अशी नवीन सदरे व स्पर्धा इ. हितगुजच्या पुढील अंकात समाविष्ट करण्याचा आमचा विचार आहे. त्यासाठी हितगुजचे अंक कमीतकमी २४ पानांचे असणे आवश्यक आहे. परंतु दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या छपाई व टपाल खर्चामुळे हात आखडते घ्यावे लागत आहेत.

मागील अंकात अध्यक्षांनी केलेल्या आवाहनास अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे सद्यपरिस्थितीचा आढावा सभासदांपुढे ठेवून परत एकदा हे आवाहन करीत आहोत.

एप्रिल २००७ ते मार्च २००८च्या तालेबंदाप्रमाणे-

| | |
|---|---|
| हितगुज निधी | रु.२,९९,६८५ |
| त्यावर मिळणारेवार्षिक व्याज | रु. २२,४७६ |
| ४ अंकासाठीचा छपाई व वितरण खर्च | रु. ५२,१५७ |

वार्षिकव्याज व खर्च यामधील सुमारे रु. ३०,००० ची तफावत आपण जाहिरातदार व सभासदांकडून मिळणाऱ्या देणग्यांवर भागवत आहोत. पण हे असे किती दिवस चालणार? हितगुजला तातडीची गरज आहे आणखी कमीतकमी रु.५,००,००० निधी, ज्याच्या व्याजातून आपणास आपले हितगुज स्वावलंबी करता येईल. मराठे परिवाराच्या अगदी ५० टक्के सभासदांनी मनावर घेतले व साधारण रु.१००० ची देणगी हितगुज निधीसाठी दिली तर हे सहज शक्य होईल.

आपले हितगुज दिमाखात चालू ठेवण्यासाठी हे जरूर आहे.

हे जर शक्य झाले नाही तर वाढत्या खर्चाला तोंड देण्यासाठी हळूहळू हितगुजची पाने कमी करत जाणे किंवा अंकांची संख्या कमी करत जाणे हेच पर्याय राहतील.

आपल्या हितगुजवर अशी पाळी येऊ नये म्हणून हे पुनश्च आवाहन.

**- श्री. रमाकांत विद्वांस (पृ.६२३)**
उपाध्यक्ष, मराठे प्रतिष्ठान

◉ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे : ८/१३, सहकार नगर, वडाळा (पू.), मुंबई-४०००३१ ◉
दूरध्वनी : २४१५०८८९ ◆ ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com
◆ अक्षरजुळणी : सौ.सुप्रिया रेडकर (लक्ष्मी ग्राफिक्स), दादर ◆

संमेलने आपण कशाला भरवितो? संमेलने भरविण्यामागे हेतू काय? संमेलनांनी काय साध्य होते? एकंदरीत समाजाची वाटचाल व मतप्रवाह यांचा विचार केला तर संमेलने भरविणे हे आवश्यक ठरते. कारण संमेलनाच्या निमित्ताने मराठे परिवार संघटित होतो आणि संघटित होणे ही मराठे प्रतिष्ठानच्या प्रगतीची खूण आहे असे मला वाटते. आज अनेक क्षेत्रात असणारी स्पर्धा व चढाओढ ही संघटीत होऊन सामोरे जाण्याने सहज सुलभ होईल. ही स्पर्धा व चढाओढ आणि आपले अस्तित्व, आपण टिकून राहाणे हे आर्थिक तसेच गुणवत्तेवर आधारित आहे. त्यामुळे प्रत्येकाने संघटीतपणे प्रयत्नशील राहाणे अगत्याचे आहे. अेकूणच राजकारणाचे निराशामय चित्र पाहाता काळाची पावले ओळखून मराठे परिवाराने संघटीत होणे अत्यंत महत्वाचे आहे. त्या दृष्टीने आपले मराठे प्रतिष्ठान वाटचाल करते आहे.

या पार्श्वभूमीवर दुर्ग येथे भरलेल्या ९व्या मराठे प्रतिष्ठान संमेलन चांगलेच परिणामकारक व संघटना वाढविणारे संघटनेचा मजबूत पाया बनलेले असे यशस्वी झाले. संमेलनाचे केवळ जत्रा असे स्वरुप न राहाता अेकत्रितपणे संघटितपणे छान सोहळा संपन्न झाला.

नवीन घराणी - कुलबांधवांनी जोडली गेली. आपल्यापासून ते इतके वर्षे दुरावले होते. १९४६ साली मराठे परिवाराचा पहिला कुलवृत्तांत प्रकाशित झाला. त्या नंतर १९९२ साली भीष्मपितामह वि.गो. तथा भाऊसाहेबांनी सुधारीत कुलवृत्तांत तयार केला. परंतु भाषेअभावी आणि काही अडचणीमुळे ते कर्नाटकात पोहचू शकले नाही. पण आज संमेलनाच्या निमित्ताने जवळजवळ ४० घराणी कुलवृतांतात समाविष्ट करण्यात आली. सी.गो. खांबेटे सुधारित कुलवृत्तांताचे काम करीत आहेत. त्यांना याचा अुपयोग आहे. संमेलनाचे हे मोठे फलित आहे.

या संमेलनामुळे कानडी 'मराठे' मंडळीशी परिचय वाढला. त्यांची दिनचर्या, व्यवसाय-व्यवहार यांची ओळख झाली. कर्नाटकातील कानडी मराठे मंडळींनी आपले सर्वांचे मनापासून हसतमुखाने केलेले स्वागत आणि आदरातिथ्य, त्यांची शिस्तप्रियता, लहान मुलांनाही लावलेले चांगले वळण - मोठ्यांचा आदर करण्याचा संस्कार, काम करण्याची हौस आणि अुरक हेसगळे मनावर कोरले गेले. रोजच्या चाकोरीतील जीवनातून थोडेसे बाहेर पडून वेगळे काही तर अनुभवावे हा हेतू संमेलनामुळे साध्य झाला. शांत, स्वास्थ, स्वच्छ जीवन, निसर्गाचा सुंदर सहवास लाभला. श्री हरिहरेश्वर मंदिराच्या पवित्र वातावरणात मन प्रसन्न झाले. कुळदेवतेच्या श्रद्धाभावात विलीन झाले.

संमेलनाचे तीन दिवस भरगच्च उत्कृष्ट कार्यक्रम पाहाण्यात कसे गेले कळले नाही. कानडी 'मराठे' परिवाराने आम्हाला कशाचीही अुणीव भासू दिली नाही. इतकी सोय पाहिली. सर्व प्रेमाने, आपुलकीने आत्मीयतेने करीत होते.

संमेलन आणि प्रवासवर्णनपर लेखात याच अंकात अधिक माहिती वाचायला मिळेल.

आता हितगुजची आजीवन वर्गणी ११०० रु. केली आहे. हितगुज अेकमेकांशी संवाद - संपर्क साधण्याचे प्रभावी माध्यम आहे. कुलबांधवांच्या देणग्या - जाहिराती यांच्या आधाराने हितगुज अजून तरी चालू राहिले आहे आणि पुढेही राहील अशी निश्चिती वाटते. कारण आपणा सर्वांना ते हवे आहे. तरी वाढविलेली वर्गणी पाठवून कुलबांधवांनी सहकार्य करावे ही विनंती.

आपली शुभचिंतक
डॉ.सौ. सुमेधा प्रभाकर मराठे
(दि. २६ मे २००९)

✦✦✦

**काळ्या हळदीचा लाभ**

मराठे परिवार संमेलन पार पडल्यावर श्री.राजेश रानडे यांच्याबरोबर कोस्टल कर्नाटकची सहल दि.४ मे ते ९ मे होती. तेव्हा आपल्या कुलभगिनी सौ.पद्मजा खांबेटे यांनी होर्नाइ गाव सोडल्यावर बस थांबावायला सांगितले आणि मोठया उत्साहाने आणि आनंदाने खाली अुतरून 'काळी हळद' अशी दुर्मिळ - अुपयोगी औषधी वनस्पती घेतली.

## हितगुज राखीव फंड निधी

श्री.प्र.रा. खांबेटे (सिकंदराबाद), श्री.महेश अनंत मराठे (मुलुंड), डॉ.वसुधा व्हि. आपटे (अंधेरी), सौ.कुमुद डोके (ठाणे), किरण सिताराम मराठे (नाशिक देवळाली), कालीदास बा. मराठे (फोंडा, गोवा), श्रीराम व्यंकटेश मराठे (पुणे), संजय परचुरे (कारवार) या सदस्यांनी 'हितगुज'साठी द्रव्य दिले त्याबद्दल त्यांना धन्यवाद.

# गुणवत्ता पारितोषिके व शैक्षणिक-वैद्यकीय मदत
## यांसाठी १५ सप्टेंबर २००९ पूर्वी अर्ज पाठवावे

**२००८-०९** मध्ये १०वी (किमान ७०% गुण), १२वी (किमान ६०% गुण), पदविका, पदवी व पदव्युत्तर परीक्षा, तसेच विज्ञान, गणित, स्कॉलरशिप व व्यावसायिक स्पर्धा/परीक्षा यामधील गुणवत्ताधारक आणि क्रीडा, संगीत, नाट्य, अभिनय इ. **अभ्यासेतर क्षेत्रांत किमान जिल्हा स्तरावर विशेष नैपुण्य** मिळवणारे कुलबांधव यांना प्रतिष्ठानतर्फे गुणवत्ता पारितोषिके/बिनव्याजी कर्ज दिली जातात.

याशिवाय **कुलबांधवांनी प्रायोजित केलेली पुढील पारितोषिकेहि** देण्यात येतात -

**१**. श्री.सी.गो.खांबेटे (पृ.६७६) प्रायोजित

**कै.कु.अनिता खांबेटे स्मृती पारितोषिके - प्रत्येकी रु.२५०**

इ.१०वी, १२वी, पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ.४थी) व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ.७वी) या परीक्षांत **मराठे परिवारांत सर्वाधिक** गुण मिळवणाऱ्यास.

२. सौ.सुलभा अनंत मराठे (पृ.३२७) प्रायोजित

**हिंदी पारितोषिक - रु.१००**

इ.१०वीच्या परीक्षेत १०० मार्कांच्या हिंदी विषयात मराठे परिवारांत सर्वाधिक गुणांसाठी.

**३**. श्री.प्रभाकर गणेश मराठे (पृ.६१) प्रायोजित

**गणेश तंत्र-शिक्षण पारितोषिक -रु.५००**

**पात्रतेचे निकष**

१)१०वीच्या परीक्षेत तांत्रिक (व्होकेशनल) विषय घेऊन मराठे परिवारात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्यास.

२)१०वीला तांत्रिक विषय नसले तरी १०वी नंतर मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक, कंप्युटर इंजिनियरिंग यासारख्या अभियांत्रिकीच्या कोणत्याही विद्याशाखेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी १०वी च्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्यास.

(मात्र १०वीला अभियांत्रिकी विषय घेणाऱ्यास अग्रक्रम देण्यात यावा)

४. श्रीम.जयश्री जगन्नाथ मराठे (पृ.३७१) प्रायोजित

**कै.जगन्नाथ दामोदर शिष्यवृत्ती- वार्षिक रु.२०००**

ऑटोमोबाईल इंजिनियरिंग शिक्षण घेणाऱ्या (पदवी, पदविका अथवा आय.टी.आय.) विद्यार्थी/विद्यार्थिनीस.

५. श्रीम.शालिनी धुंडिराज मराठे (पृ.१३४) प्रायोजित

**वैदिक शिक्षण/हिंदुधर्मप्रचार यासाठी पुरस्कार-वार्षिक रु.१०००**

६. शैक्षणिक (बिनव्याजी) कर्ज -

**कै.विनय खांबेटे स्मृती योजनेतून मेडिकल/इंजिनियरिंग शिक्षणासाठी** बिनव्याजी कर्ज (रु.३०,००० पर्यंत) दिले जाते.

गुणवत्ता पारितोषिके/बिनव्याजी कर्ज यांसाठीचे **अर्ज १५ सप्टेंबर २००९ पर्यंत** प्रतिष्ठानकडे पाठवावे. अर्ज फक्त **२००८-०९** या वर्षी झालेल्या परीक्षांबाबत असावे. स्वत: विद्यार्थी अथवा त्याचे/तिचे पालकांपैकी कोणी प्रतिष्ठानचे सभासद आहेत की नाहीत हे नमूद करावे. (मात्र पात्रतेसाठी सदस्यत्व ही अट नाही.)

निकालाच्या प्रमाणपत्राची प्रत **अर्जाला जोडून** पाठवावी. नुसतीच प्रमाणपत्राची प्रत पाठवू नये. सोबत आयडेंटिटी कार्ड आकाराचा फोटो पाठवावा. शक्य असेल त्यानी ही माहिती ई-मेल वरून पाठवावी म्हणजे मिळाल्याची खात्री करून घेता येईल. **खास बक्षिस योजनेखाली** (हिंदी, तांत्रिक विषय, ऑटो इंजि., वैदिक शिक्षण/हिंदुधर्म प्रचार याबाबत) **अर्ज केला असल्यास तसा उल्लेख अर्जात करावा.**

पत्रोत्तर देण्यासाठी **अर्जात पूर्ण पत्ता लिहावा.**

**शैक्षणिक, वैद्यकीय मदत**

गुणवत्ता पारितोषिकांप्रमाणेच प्रतिष्ठानतर्फे कुलबांधवांना शिक्षणासाठी तसेच आजारपणात मदत केली जाते. उत्पन्नाचा निकष न लावता गरजेच्या प्राधान्याने विचार करून अशी मदत दिली जाते.

बायपास, कॅन्सर यासारख्या मोठ्या आजारासाठीही खास निधीतून (विशिष्ट हेतु निधी) मदत मिळू शकते.

शैक्षणिक मदतीसाठी, वैद्यकीय खर्चासाठी आणि गरजू वृद्धांना सहाय्यासाठीहि कुलबांधवांनी नि:संकोचपणे प्रतिष्ठानला लिहावे.

**कविता**

अंग्रेजोनो डाली फूट कहकर सबको झूट मूठ  
अलग हो गये हिंदुमुसलमान देख महजब की झुटी शान  
उन्ही अंग्रेजों की अंग्रेजी में लिखो

DIW**ALI** और **RAM**ZAN

देख दिवाली में है अली  
तो रमझान में हैं राम  
कश्तीया अलग सही  
पर एक हैं मुकाम  
जब मिलेगा रमझान में राम  
और दिवाली में अली  
तब उखाड फेंको ये सियासती कली  
आपसमें बटेगा भाईचार  
सियासती दुष्मन फिरेगा मारा-मार  
ये विचार हैं जोशी का  
रास्ता अमन चैन और खुषी का

**- श्री. चैतन्य जोशी,**  
**(लेखक-पत्रकार) कारवार**

# मराठे प्रतिष्ठान

## ९वे अखिल भारतीय मराठे संमेलन
## दुर्गग्राम, ता.कार्कळ (उडिपी)
## कर्नाटक - १ मे २००९ - ३ मे २००९
## ४मे ते ९ मे कोस्टल कर्नाटक सहल

**लेखिका - श्रीमती साधना मराठे (पृ.३६९), नाशिक**

दि.३०.४.२००९ रोजी रात्री ११.१० ला पुण्याहून हुबळीकडे रेल्वेने प्रवास सुरु केला. मराठे परिवारातील एकूण १८ जण मुंबई, नाशिक, पुणे येथून निघाले. सकाळी १०.३०ला दि.१.५.२००९ रोजी हुबळीला पोहोचलो. तिथे जेवण घेऊन २.०० वाजता सहल आयोजक श्री.रानडे यांनी दोन सुमो ठरवून रात्री १२.०० वाजता दुर्गला पोहोचलो. एवढ्या रात्री सुद्धा संमेलन आयोजकांनी जेवण तयार ठेवले होते. भात, बटाटा भाजी व रस्सम असे स्वादिष्ट भोजन घेतले. श्री.फाटक यांचेकडे मुक्कामाची सोय केली होती. एवढ्या रात्री देखील घरातल्या गृहिणी सौ.गीता फाटक यांनी अंगात ताप असताना देखील हसतमुखाने स्वागत केले. अंथरुणं झोपायला तयार होतीच, त्यामुळे दिवसभराचा थकवा गेला आणि रात्री २.०० वाजता झोपेच्या अधीन झालो.

सकाळी सौ.गीताताईंनी उत्तम चहा दिला. घर मोठे असल्याने ८ स्त्रिया व ४ पुरुष अशी १२ जणांची उत्तम सोय झाली. कुठलीही गैरसोय झाली नाही. सकाळी ८.०० वाजता संमेलन आयोजकांनी संमेलन स्थळी जाण्यायेण्यासाठी वाहनाची सुविधा ठेवली होती. ८.३० वाजता इडली, सांबार, चटणी व अननस शिरा असा भरपूर नाश्ता होता. त्याचा आस्वाद घेऊन नोंदणी करून संमेलनातील १ल्या सत्रास सुरुवात झाली. प्रमुख पाहुणे श्री.विष्णूमूर्ती मराठे व प्रतिष्ठानचे सर्व कार्यकर्ते यांची व्यासपीठावर ओळख करून देण्यात आली. कार्यकर्त्यांचे कार्य, कामाची प्रगती व उर्वरित कामाची चर्चा झाली. तरुण कार्यकर्ते श्री.हेमंत मराठे यांनी पुढील तरुण मुलांसाठी व गरजू रुग्णांसाठी निधीतून विनव्याजी रक्कम द्यावी असा प्रस्ताव मांडला व अध्यक्षिय भाषण होऊन १ले सत्र संपले. दुपारी मिष्टान्नासह तेलपोळी, गव्हाची खीर, सांबार, भात, सुरणाची भाजी, कोबी मूगडाळ कोशिंबीर, फणसाचा पापड असे सुग्रास प्रसादी भोजन श्रीहरिहरेश्वर मंदिरातर्फे (अन्नदानाचे) झाले. अतिशय शिस्तीत व मुख्य म्हणजे शिबिरातील ८ ते १५ वयोगटातील मुले वाढत होती. भोजनानंतर संमेलन आयोजकांनी मराठे मिल्क प्रॉडक्ट व परशुराम मंदिर दर्शनासाठी आलेल्या पाहुण्यांसाठी गाडीची व्यवस्था करून दिली असल्याने जाणे सोयीचे झाले.



संमेलनाला अुपस्थित राहिलेला मराठे परिवार

मिल्क प्रॉडक्ट म्हणजे दुधाचे पदार्थ. पुरणपोळी व म्हैसूरपाक इ. चे प्रात्यक्षिक दाखविले व निघताना सर्व उत्पादनांची नमुना दाखल म्हणजे भरपूर आस्वाद घेतला व बदामशेक पिऊन परशुराम मंदिराकडे गेलो. डोंगरातील सुपारी, नारळाच्या बागांचे नयन मनोहर दृश्य उन्हाळ्याचा ताप सुसह्य करत होते.

सायंकाळी ५.३० वाजता संमेलन स्थळी आलो. चहा, फणसाचे सांदण व बटाटेवडा असा भरपूर नाश्ता तयार होता.अशा रितीने पाहुणचाराचे व व्यवस्थेचे चोख नियोजनाचे प्रत्यंतर प्रत्येक वेळी येत होते. ६.३०ला दुसऱ्या सत्रात करमणूकीचे कार्यक्रम, अध्यक्षीय भाषण व व्यासपीठावरील मान्यवरांची भाषणे झाली. सकाळचे सत्र पूर्ण मराठी व इंग्रजी भाषेत आणि २रे सत्र पूर्ण चित्पावनी व कारवारी भाषेत झाले. बरेचसे समजले नाही. सहस्त्रार्जुन व परशुराम आख्यान चित्पावनी भाषेत झाले. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे कु.वेदश्री मराठे हिचे भरतनाट्यम्. इ.४थीत असलेल्या वेदश्रीने विविध अविष्कार म्हणजे थाळीनृत्य व डोक्यावर

मेणबत्ती घेऊन अतिशय एकाग्रतेने चपळ हालचाली करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. अवर्णनीय अशी भरतनाट्यम् व कुचिपुडी कला तिने सादर केली. प्रोत्साहनार्थ श्री.मराठे परिवारातील सदस्यांनी बक्षिसे दिली.

२ मे २००९ रोजी सकाळी ८.०० वाजता संमेलनस्थळी पोहोचलो. गेल्यावर उपमा,दडपे पोहे व चहा असा भरपूर नाश्ता घेतला व सभागृहात गेलो. तेथे योगाचे प्रात्यक्षिकासह भाषण होऊन संमेलनाबद्दल हार्दिक मते बऱ्याच लोकांनी व्यक्त केली. सगळ्यांचा अभिप्राय उत्तम व्यवस्था असाच होता. समारोपाची भाषणे व आभारप्रदर्शन होऊन १२.३०ला हरिहरेश्वराची आरती होऊन भोजन व विश्रांती घेऊन रात्री ७.३० ला पुन्हा संमेलनस्थळी भजनसंध्या कार्यक्रमात भजनसेवा देण्याचा मी व आणिक सहकार्यांनी प्रयत्न केला. रात्री १०.३०ला श्री.फडके यांचेकडे मुक्काम केला. दि.४.५.२००९ ला ७.३० वाजता आमची कर्नाटक सहल सुरु होणार होती.

एकूण दुर्गवासीयांनी मराठे संमेलन हे अतिशय आनंदाने, उत्साहाने व नीटनेटका असा अप्रतिम सोहळा केला. त्याबद्दल त्यांचे शब्दात आभार मानणे शक्यच नाही. श्री. व सौ. फाटक यांनी आमची व्यवस्था प्रेमपूर्वक केली. त्यांची मुले सुद्धा मनमिळावू व प्रेमळ आहेत.

## कर्नाटक समुद्रकिनारा सहल

दि.४ मे २००९ रोजी सकाळी १०.३० ला शृंगेरी येथील श्री. शंकराचार्य मठ व शारदादेवी मंदिर पाहिले. दोन्ही देवळांच्यामध्ये तुंगभद्रा नदी आहे. नदीत बरेच मोठेमोठे मासे आहेत. श्री शंकराचार्य स्वामींचे दर्शन झाले (सध्याचे पिठाधिपती). शृंगेरी येथे भोजन घेऊन होडनाडूकडे प्रयाण मध्ये कुद्रेमुख लागले. याचा अर्थ घोड्याचे तोंड व होइनाडू याचा अर्थ गावाबाहेर असा होतो. म्हणजे पूर्ण डोंगरांची रांग. डोंगरातून कुर्ग येथे जायला ट्रेकिंग शिवाय पर्याय नाही. म्हणजे अन्नपूर्णा मंदिरापासून समोर रस्ता नाही. श्री अन्नपूर्णा देवीची ५ फूट उंचीची सुवर्णमूर्ती श्री. आद्यशंकराचार्यांनी स्थापित केली आहे. तेथे यथाशक्ती पैसे देऊन अन्नदानाची सुविधा आहे. रकमेची पावती घेऊन ताम्हनातून (तेथील पुजारी) तांदूळ देतात ते धान्याच्या दानपेटीत देवीपुढे दाखवून अर्पण करायचे असतात. ५.०० वाजता होइनाडूहून उडपीकडे प्रयाण केले. होइनाडूला चहा कॉफीचे मळे व अप्रतिम हिरवाईची सृष्टीसौंदर्य आहे. येथील जंगलात पांढर्या पानांची (फुलासारखी पाने) झाडे आहेत. त्याचे नाव शिरडोई असे आहे. त्याच्या पानांचा लगदा शांपूप्रमाणे केस धुण्यासाठी करतात. ९.०० वाजता उडपी येथे रुक्मिणी हॉटेलमध्ये उत्तम वास्तव्य व भोजनाची सोय होती. होइनाडूहून येताना आश्चर्य म्हणजे आम्ही धुक्यातून प्रवास केला. मे महिन्यात धुक्याचा अनुभव घेतला. थोडा पाऊस देखील शिंपडला होता.

दि. ५ मे २००९ रोजी सकाळी ७.४५ वा. उडपीतील श्रीकृष्ण मंदिर पाहिले. नंतर धर्मस्थळी ११.४५ वाजता पोहचलो. इथे कुटुंबातील अथवा अन्य क्लिष्ट गोष्टींच्या न्यायिनवाड्याचा निकाल हा अंतिम निर्णय समजला जातो. श्री. मंजूनाथाचे महादेवाचे देऊळ आहे. यात परंपरेप्रमाणे वारसादारास न्याय देण्याची पदवी प्रदान करतात. भोजन घेऊन आम्ही अन्नपूर्णेश्वरी मंदिराकडे प्रयाण केले. व ५.३० वाजता कापू बीच पाहिला.

दि. ६ मे २००९ रोजी सकाळी ७.३० ला नाश्ता करून कुंदापूर अन्नेगुडीच्या गणपतीचे दर्शन घेतले. व नंतर कोलूरचे मोकांबिका देवीचे दर्शन करून २.३० वाजता मुरुडेश्वर येथे प्रयाण केले. वाटेत घनदाट जंगल लागले. मुरुडेश्वराचा समुद्रकिनारा अप्रतिम आहे. सूर्योदय व सूर्यास्त दोन्ही दिसतात. R.N.S. हॉटेलमध्ये मुक्काम होता. रात्री नवीन बीच हॉटेलमध्ये समुद्राच्या गाजेच्या आवाजात जेवण घेतले व परत R.N.S. हॉटेलवर आलो. मुरुडेश्वर देवस्थान म्हणजे रावणाने इथे गणपतीने ठेवलेले आत्मलिंग उपटण्याचा प्रयत्न केला. पंचक्षेत्रातील पहिले क्षेत्र मुरुडेश्वर पाहून झाले. आज वाटेत आमच्या बरोबरीच्या सौ.उर्मिला मराठे या शीघ्रकवियत्रीने आम्हा ८ स्त्रियांवर शीघ्रकाव्य केले. त्या काव्याचे वाचन केले. प्रत्येकीचे वर्णन समर्पक होते. (या अंकात पृ.६ वर छापले आहे)

दि.७ मे २००९ रोजी सकाळी ७.२२ वाजता इडगुंजीच्या गणपतीचे दर्शन, गुणवंतेश्वर धारेश्वर मंदिर पाहिले. या गणपतीचे वैशिष्ट्य म्हणजे याचे दोन्ही दात पूर्ण आहेत व दोन हात आहेत. गोकर्णला दुपारी १२.०० वाजता पोहोचलो. मंदिरातील गाभाऱ्यातील खांब अप्रतिम कोरीवकाम केलेले आहेत. रावणाने शिवलिंग उपटण्याचा इथे प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्याचा आकार गाईच्या कानाप्रमाणे झाला आहे. गोकर्णाला समुद्रकिनाऱ्याचा आकार ओम प्रमाणे झालेला असल्याने त्याला ओमबीच नाव पडले आहे. सायं. ५.०० वाजता कारवारला आलो. नवरतन हॉटेलमध्ये उतरलो होतो. कारवारला सदाशिव गड व कारवार बीच बघितला. इथे काळी नदी व समुद्राचा संगम झाला आहे. सदाशिव गडावर दगडाचा घोडा व तोफा आहे. लपण्यासाठी दगडी विवरं केली आहेत. समुद्रकिनाऱ्याचे दर्शन फारच छान होते. मधून गडाला जोडणारा १ कि.मी. लांबीचा पूल बांधला आहे. येताना कऱ्हाडे ब्राह्मणांची कुलदेवता श्री आर्यादुर्गा देवीचे मंदिर पाहिले. मूर्ती फारच विलोभनीय आहे.

दि. ८ मे २००९ रोजी सकाळी ८.३० वाजता कारवारहून निघालो. प्रथम शेजेश्वर मंदिर पाहिले. येल्लापूरात जाण्यास निघालो. घनदाट जंगल पार करून मागोड फॉल पाहिला. उन्हाळा असून वरपर्यंत आवाज येण्याइतके पाणी होते. सृष्टीसौंदर्य पावसाळ्यात फार रमणीय असेल. नंतर सहस्त्रशिवलिंग दर्शन घेतले. तिथे शिल्पकारांची कार्यशाळा असावी असे वाटते

कारण प्रशिक्षण घेताना शिवलिंग अथवा नंदी अशा मूर्ती अर्धवट स्थितीत नदीत विसर्जन केलेल्या वाटतात. पाण्याच्या प्रवाहामुळे दगड काळेशार व गुळगुळीत झाले आहेत. शिरसीत ३.०० ला जेवणव विश्राम करून वनवासीला गेलो. खरोखरच मोठे बन पार करून बनवासी गाव आहे. रस्त्याच्या दुतर्फा सुपारी व केळीच्या बागा आहेत. बनवासीचे दोन हजार वर्षांपूर्वीचे देऊळ म्हणजे शिल्पकारांचे कसब व स्थापत्यशास्त्राचाच उत्कृष्ट नमुना आहे. त्याचे शब्दात वर्णन करणे अशक्य आहे. तिथल्या पुरोहितांनी देवळाबाहेरील प्रत्येक मूर्तीची शास्त्रशुद्ध माहिती सांगितली. पंचमहाभुतांचा यम केदार बालाजी शेषनाग गणपती फक्त उजव्या अंगाचा आहे व नंदीची भव्यता नजरेत भरते. नंदी पार्वतीकडे उजव्या डोळ्याची नजर ठेवून असलेला आहे. विशिष्ट कोनातून पाहिल्यास आपल्याला पार्वतीच्या देवळातून नंदीचा उजवा डोळा दिसतो. शिल्पकलेपुढे नतमस्तक व्हावेसे वाटते. कर्नाटकची समुद्रकिनारा सहल परिपूर्ण झाल्याचे देऊळ पाहून सार्थक झाले. नंतर मरिकांबा देवीचे दर्शन घेतले व भोजन आणि विश्राम केला.

दि.९ मे २००९ रोजी सकाळी ८.३० वाजता जोग फॉलकडे प्रयाण केले. धबधब्यावर पाण्याचे प्रमाण कमी होते, पण तिथे निसर्गाने सौंदर्याची लूट केली आहे. पर्वतरांगा एकमेकांत गुंतल्यासारख्या रचलेल्या वाटतात. आपले मन सुद्धा गुंतून राहते.

अशारितीने मराठे प्रतिष्ठानच्या संमेलनामुळे कर्नाटक समुद्रकिनारा सहल संपन्न झाली.

**श्रीमती. साधना वसंत मराठे (पृ.३६९)**
३, वसंत बंगला, पाटील कॉलनी लेन नं. ३,
अेच.पी.टी. कॉलेज रोड, नाशिक - ४२२००५.
दूरध्वनी - ०२५३-३१-७०१

✦✦✦

**मानसन्मान**

चि. यश मुकुंद लेले याने चौथीची शिष्यवृत्ती परीक्षा, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची गणित परीक्षा आणि मराठा मंदिर महाराष्ट्र ज्ञानपीठ (गणित) या तीनही परीक्षांत अव्वल यश संपादन केले. चौथी शिष्यवृत्ती परीक्षा राज्यात सहावा, गणित अध्यापक मंडळाची प्रज्ञा परीक्षा गुणवत्ता यादीत पन्नासावा या परीक्षांमध्ये १०० पैकी अनुक्रमे ९७ व ९९ गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविण्याचा मान चि. यशने मिळविला. मराठे प्रतिष्ठान द्वारा चि. यशचे हार्दिक अभिनंदन पुढील शिक्षणासाठीही शुभेच्छा.

## चार वाटेवरच्या चौघीजणी
## आज जमल्या एकत्र

*पाहण्या निसर्ग आणि लुटण्या जीवनांतील आनंद*
*तपस्वी साधनेचे बळ तिच्या चेहऱ्यावर दिसते*
*शांत, शितल वाऱ्याची झुळूक जणू ती भासते.*
*माधवीचा साधेपणा मनास मोहवून जातो*
*रोहिणीचा अभ्यासूपणा सर्वांच्या मनाची पकड घेतो.*
*सुमेधाचे सुंदर अवखळ हसणे*
*जणू वाऱ्यावरची लकेर भासते*
*हाय कमांड नीलांबरीला हाती छडी शोभते*
*ललीता आपली शांतपणे श्रोत्याची भूमीका घेते*
*सर्व आयुर्वेदाची महती सांगणे पद्मजा आजींनाच जमते.*
*निसर्गाचे अनोखे रुप उर्मिलाला भावते.*
*चार शब्दांचे रुप तेव्हा कवितेचे होते.*

**सौ. उर्मिला**

श्री. दत्तात्रेय आ. मराठे, दि. १८.१.२००९ रोजी प्रसिद्ध जलतरणपटू विनोद घाडगे, यांच्या स्मृतिप्रित्यर्थ, जी.एम्.अे.अे.अे. या संस्थेने खार येथील तरणतलावावर आयोजीत केलेल्या स्पर्धेत भागघेतला होता. ६१ वर्षेवरील वयोगटात, २५ मीटर फ्री स्टाईल स्पर्धेत त्यांना तृतीय पारितोषिक मिळाले.

मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. दत्तात्रेय आत्माराम मराठे यांचे हार्दिक अभिनंदन.

**- संपादिका**

**खापरपणजी सौ.गौरी शिवराम मराठे**
यांच्या स्मरणार्थ
**CA प्रभाकर दामोदर मराठे (पृ.१२०)**
वडाळा, मुंबई-४०००३१
सेल: ९८२०२३२०८२ दूरध्वनी: २४१५०८८९
ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com

# आमच्या आई

**सौ. संजिवनी मराठे, डायरेक्टर**

***सन १९३४ साली दत्तात्रेय हरि मराठे व धुंडीराज हरि मराठे या बंधूंनी तंत्रशिक्षणासाठी रेडिओ इलेक्ट्रिक इन्स्टिट्यूटची स्थापना केली. रेडिओ तंत्रशिक्षण देणारी भारतातील ही पहिली संस्था होय. व्यवसाय तंत्रशिक्षण क्षेत्रात मराठे बंधू, धुंडीराज मराठे यांच्या इंजिनिअर पत्नी श्रीमती शालिनी मराठे व त्यांची दुसरी पिढी सौ. शीला मराठे - चिटणीस, श्री. उमेश व सौ. संजीवनी मराठे यांनी भरीव कामिगरी केली आहे. २००९ साली या संस्थेचा अमृत महोत्सव आहे. त्या निमित्त त्यांच्या सुनबाई सौ. संजीवनी यांनी लिहीलेला हा लेख.***

आमच्या, आई, श्रीमती शालिनी मराठे, या मूळच्या मिरजेच्या! वडिलांच्या अत्यंत प्रगत, काळाच्या पुढे असणाऱ्या विचारांच्या संस्कारात वाढलेल्या! त्यांचा जन्म १९२२ सालचा, म्हणजे आईंची ८६ वर्षे पुरी झाली. प्रत्येक स्त्रीला अभिमान वाटवा, मार्गदर्शकपर वाटावा असा त्यांचा जीवन-प्रवास!

आपल्या शास्त्रकारांनी मनुष्यजीवनाचे चार टप्प्यांत (आश्रमात) विभाजन केले आहे. प्रथम टप्प्यात शिक्षण, दुसऱ्या टप्प्यात गृहस्थजीवन, तिसऱ्यात वानप्रस्थ व चवथा संन्यासाश्रम !आमच्या आई हे पहिले तीनही टप्पे आदर्शवत जगल्या. पहिल्या टप्प्यात त्या मॅट्रिकच्या परिक्षेत सांगली जिल्ह्यांत मुलींमध्ये पहिल्या आल्या व नंतर पुण्याच्या स.प. महाविद्यालयातून गणित विषय घेऊन ग्रॅज्युएट झाल्या. यथावकाश १९४४ साली लग्न होऊन मराठे कुटुंबियांची सून झाल्या. मराठे कुटुंब हे त्याकाळचे उच्चशिक्षित (पती - धुंडिराज M.A.B.T. एक दीर डॉक्टर, एक इंजिनिअर). त्यांच्या दीराने व पतीने एकत्र 'रेडिओ इलेक्ट्रिक इंस्टिट्यूट' ची १९३४ साली व १९३९ साली एका लघुउद्योगाची स्थापना केली.

असा प्रगत कुटुंबात प्रवेश केल्याने आईच्या मूलभूत स्वतंत्र बुद्धिला उत्तेजनच मिळत गेलं. अतिशय उत्तम सांपत्तिक परिस्थिती असूनही घरांत किंवा क्लबमध्ये वेळ फुकट घालवणे पसंत नसल्याने आईने रेडिओ इलेक्ट्रिक इंस्टिट्यूटमध्येच प्रशिक्षण घेऊन व स्वतंत्र अभ्यास करून त्याकाळची मान्यताप्रत 'ग्रॅज्युएट ऑफ बिटीश इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स' (हल्लीच्या AMIE प्रमाणे) ही इंजिनिअरिंगमधील पदवी प्राप्त केली. त्यानंतर पतीना व दिरांना थोडाथोडा हातभार लावू लागल्या.

मला वाटते, आमच्या आई त्या वेळेस महाराष्ट्रातल्या, कदाचित भारतातल्या, काही मोजक्या स्त्री इंजिनिअर्सपैकी असाव्यात. १९६०-६१ पासून त्या इंस्टिट्यूटमध्ये शिकवायला लागल्या. त्यांचे विषय होते इलेक्ट्रॉनिक्स व रेडिओ इंजिनिअरिंग. एक उत्तम शिक्षिका म्हणून त्यांचा नावलौकिक होता. याच सुमारास (६५-७२) आईंनी विद्यार्थ्यांसाठी तीन टेक्निकल पुस्तके लिहिली. १९६७च्या सुमारास रेडिओ सर्विसिंगवर, १९६९ साली टेक्निकल गणितातील प्रश्नांवर, १९७० साली ट्रान्झिस्टर सर्विसिंगवर. १९७२ साली दीर पावले व इन्स्टिट्यूट व फॅक्टरी अशी दुहेरी जबाबदारी आईंवर पडली.

१९६६ साली आई इलेक्ट्रिकल इंजिनियरींग फॅक्टरीत उत्पादनतंत्र जाणून घेण्यासाठी सहा महिन्यांसाठी जर्मनीला गेल्या होत्या. तिथे त्या एका किफान नावाच्या जर्मन कुटुंबात रहात होत्या. सौ. किफानने एकदा त्यांना विचारलं की आमचा मॅक्सम्युलर ज्या ग्रंथाला डोक्यावर घेऊन नाचला त्या भगवत्‌गीतेबद्दल फारशी माहिती नव्हती. अतिशय शरम वाटली त्यांना! भारतात परत आल्यावर जाणून घ्यायचा निश्चय केला. हा एक ईश्वरी संकेतच होता! त्यांच्या वानप्रस्थतजीवनाचा पाया बनणारा, पुढच्या आयुष्याची दिशा ठरवणारा हा सौ. किफानचा प्रश्न! भारतात आल्यावर शोध घेऊ लागल्या कि हे तत्वज्ञान कुठे शिकता येईल? त्यांच्या सौभाग्याने व ईश्वरकृपेने त्या स्वामी चिन्मयानंद (चिन्मय मिशन व विश्व हिंदू परिषदेचे संस्थापक) यांच्या सहवासात आल्या. स्वामी चिन्मयानंदांचं प्रभावी संस्थापक) यांच्या सहवासात आल्या. स्वामी चिन्मयानंदांचं प्रभावी वक्तृत्व, अस्खलित इंग्रजी, तत्वज्ञानासारखा गहन विषय सहजसुलभ करून सांगण्याची पद्धत, तसच अतिशय विज्ञानयुक्त विश्लेषण या सर्वांनी त्या अत्यंत भारावून गेल्या. घर, संसार, इन्स्टिट्यूटचा प्रपंच या बरोबरच आणखी एक परिणाम त्यांना लाभलं. सर्व काही सांभाळून स्वामीजींचे ज्ञानयज्ञ ऐकण। त्यांच्या शिबिरांना जाणे, चिन्मय मिशनच्या गिरगावातील कमिटीवर काम करून विचारसत्र, ज्ञानयज्ञ आयोजित करणे या ही गोष्टी मन:पूर्वक करू लागल्या. १९७६ साली छोट्या आजारामध्ये त्यांच्या पतीचं देहावसान झालं. शांत प्रकृतीच्या, धीरगंभीर स्वभावाच्या पतीचे भक्कम पाठबळ नाहीसे झाले. अनेक वर्षाच्या सुखी सहजीवनाचा अचानक शेवट झाला होता. ह्या बेचैनी व अस्थिरतेच्या काळात त्यांच्या मदतीला धावली त्यांची मुलगी शीला. आपली उत्तम पगाराची व परदेशात जाण्याची सुसंधी सोडून आपल्या आईच्या मदतीला आली व आईच्या बरोबर ऑफिसमध्ये काम करू लागली. एका वर्षाने मुलगा उमेश I.I.T. तून B.Tech. होऊन आला व परदेशी शिक्षणाच्या संधी डावलून संपूर्ण फॅक्टरीची

जबाबदारी त्याने उचलली. इन्स्टिट्यूट शीलाताई व फॅक्टरी उमेश. अशी जबाबदारी वाटून आई हळूहळू निवृत्तीच्या दिशेने पाऊल उचलू लागल्या.

आमच्या आईंनी त्यांच्या आयुष्याच्या तिसऱ्या टप्प्यात म्हणजेच वानप्रस्थात प्रवेश केला. साठीनंतर चिन्मय मिशनमधे वर्षभर राहून वेदान्ताचा कोर्स पूर्ण केला व पुणे ही कार्यभूमी केली. तिथे चिन्मय मिशनतर्फे प्रवचनसत्र (गीता/उपनिषद) २/३ अभ्यासवर्ग वगैरे त्या स्वत: घेतात. चिन्मयमिशनच्या अनेक स्वामींचे ज्ञानयज्ञ आयोजित करतात. इतकेच नव्हे तर त्यांनी चिन्मय मिशनसाठी स्वामीजींच्या दोन इंग्रजी पुस्तकांचे मराठीमधे भाषांतरही केले. 'हृष्यामि च पुन: पुन:' हे स्वामी चिन्मयानंदांच्या आठवणी असणारे पुस्तक मराठीत वयाच्या ऐंशीव्या वर्षी लिहीलं.

आई ८० व्या वर्षानंतर इंटरनेट वापरायला शिकल्या. आता वेबसाईटस् पहातात, स्वत: ईमेल्स करतात! ८६ व्या वर्षी देखील आम्हाला लाजवेल असा उत्साह असणाऱ्या, आमच्यापेक्षाही व्यस्त जीवन जगणाऱ्या, जीवनात अजुनही रस टिकून असलेल्या!

स्वत:च्या धंद्यातून अत्यंत मानाच्या जागेवरून स्वत:हून निवृत्ती घेऊन वेगळा मार्ग चोखाळणाऱ्या!

आम्ही सर्व त्यांचा आजही सल्ला घेतो, त्यांच्या शाबासकीची वाट पहातो.

(दि.८ मार्च २००९ला जागतिक महिलादिनी कर्तबगार स्त्रियांचा सत्कार महानगरपालिकेने केला. श्रीमती शालिनीताईंचा सत्कारही महापौर शुभा राऊळ यांनी शाल आणि श्रीफळ देऊन केला. मराठे प्रतिष्ठानद्वारा शालिनीताईंचे अभिनंदन.)

**सौ. संजिवनी मराठे**
डायरेक्टर

✦✦✦

## कविता

### मुळा धरण सुवर्ण महोत्सव १३,२४ ऑक्टोबर २००८

***मुळा धरण बांधण्यात श्री.वि.म. मराठे यांचा फार मोलाचा वाटा होता. मुळा धरण सुवर्णमहोत्सवी श्री.वि.म. व त्यांचे अभियांत्रिकी सहकारी यांचा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी त्यांच्या सुविद्य कन्या सौ.विद्या वैशंपायन यांनी केलेली कविता.***

प्रसंगी ज्ञानेश्वर सागरास प्रणाम
सुवर्णाक्षरांनी लिहावा एसा सुदिन आज लाभला
भाग्य लाभले उपस्थितीचे आपल्या संमेलनाला
फुलविले येथे नंदनवन आपण गाळूनी घाम
सकल समर्पित अभियंत्यांना करिते नम्र प्रणाम।।१।।

थंडी ऊन वाऱ्याची तुम्ही तमा नाही बाळगिली
तहान भुकेची जाणीवही कामापुढे विसरली
अविरत श्रमणाऱ्या हाताना नसेल ठावा विश्राम
सकल समर्पित अभियंत्यांना करिते नम्र प्रणाम।।२।।

पाण्याने या धरणाच्या किती बहरत असतील जीवने
पाण्याने या धरणाच्या किती फुलतील शेती वने
५० वर्षेच का? चिरंतन स्मरेल मुळा धरणाचे नाम
सकल समर्पित अभियंत्यांना करिते नम्र प्रणाम।।३।।

भारत भूवर उमटला तुमच्या कतृत्वाचा ठसा
उत्साह आजही आहे तरुणाला लाजवील असा
किर्तीचा हा वारू तुमचा असाच दौडावा बेफाम
सकल समर्पित अभियंत्यांना करिते नम्र प्रणाम।।४।।

लाभो आयुष्य आरोग्य तुम्हा असे ईश्वरास प्रार्थिते
मनोगतामध्ये शेवटी आशिष तुमचे मागते
नाकारणार नाही तुम्ही असा आहे विश्वास ठाम
सकल समर्पित अभियंत्यांना करिते नम्र प्रणाम।।५।।

दि.१२.१०.२००८


**सौ. विद्या वैशंपायन** (पृ.२३५)
(श्री. वि.म. मराठे यांची कन्या)
पत्ता:भक्ती अपार्टमेंट विमल विहारच्या मागे,
बिबवे वाडी, पुणे - ४११०३७
फोन नं.२४२१६३७२

शनिवार दि.९ मे २००८ला. स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, दादर यांच्या वतीने हिंदुमहासभा नेते श्री. विक्रम सावरकर यांना ''जीवनगौरव'' पुरस्काराने सन्मानित केले. दि. ९ मे २००८ ला त्या निमित्ताने डॉ.सौ.सुमेधा मराठे यांचा हा संक्षिप्त लेख 'दै. सामना' या वर्तमानपत्रात प्रकाशित झाला होता.

# स्वातंत्र्यवीर सावरकरांचे कृतीशील अनुयायी
# श्री. विक्रम नारायण सावरकर

*''की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने।*
*लब्ध प्रकाश इतिहास निसर्गमाने।*
*जे दिव्य, दाहक म्हणूनि असावयाचे।*
*बुध्याच वाण धरिले करी हे सतीचे।।''*

मार्च १९१० मधे लंडनमधील बिक्स्टन कारागृहातून स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी आपल्या येसूवहिनींना 'माझे मृत्यूपत्र' या मथळ्याखाली लिहिलेल्या काव्यमय पत्रात या ओळी आहेत. या ओळीत व्यक्त केलेला निर्धार क्रांतिकारक त्रिवर्ग सावरकर बंधूंनी (गणेश, विनायक, नारायण) आपल्या जीवनात आचरिला. पुढील पिढीत विक्रम नारायण सावरकर हेच देशसेवेचे व्रत त्याच निर्धाराने आजीवन पाळत आले आहेत हे विशेष.



## कृतीशील अनुयायी

विक्रम सावरकरांचा जन्म २ डिसेंबर १९३१ मुंबईत. घरगुती कारणांमुळे १९४५ मधे त्यांचे शिक्षण माध्यमिक शालेय ते एम.कॉम होण्यापर्यंत नागपूरला, त्यांचे आईचे मामा अधिवक्ता (कै.) वि.वि. केळकर यांच्याकडे झाले.

१९४५-१९४६ मधे ब्रिटीशांकित भारतात, मध्यन्तर शासन निवडण्यासाठी निवडणूका घेण्यात आल्या त्यात, स्वातंत्र्यवीर सावरकरांनी हिंदुमहासभेला दिलेल्या, 'अखंड हिंदुस्तानचे स्वातंत्र्य मिळविण्याची घोषित केलेली राजनीती' विजयी होईल; असा विद्यार्थी विक्रम सावरकरांना ठाम विश्वास होता. परंतु या निवडणूकीत काँग्रेस विजयी झाली आणि हिंदुमहासभेचा पराभव झाला. याचा अभ्यासपूर्ण विचार केल्यानंतर विक्रम सावरकरांच्या लक्षात आले की, 'स्वातंत्र्यवीरांचा भक्तीभावाने गौरव करणारे अनेक होते; परंतु देशाचे विभाजन रोखण्यासाठी त्यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार प्रत्यक्ष लढाऊ कृती करणाऱ्या अनुयायांची वानवा होती.'

त्याचवेळी त्यांनी असा निश्चय केला की, आपण स्वातंत्र्यवीर सावरकरांची विचारसरणी प्रत्यक्ष कार्यवाहीत आणण्यासाठी कृतीशील अनुयायी म्हणून देशकार्य करायचे!..... आणि मग विद्यार्थीदशेपासूनच विक्रम सावरकरांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या राजनीतीचा कृतीशील आंदोलनांच्या माध्यमातून प्रसार करण्याचे कार्य अवलंबिले.

## आंदोलने - संघर्षमय लढे

श्री. विक्रम सावरकरांनी अखिल भारत हिंदुमहासभेचे अध्यक्षपद १९८० ते १९८७ ही सात वर्षे समर्थपणे भूषविले. सन १९४८ मधे गांधीवधानंतर संघावर बंदी घालण्यात आली तेव्हा त्या अन्याय्य बंदीविरुद्ध सत्याग्रही आंदोलनात त्यांनी सक्रीय भाग घेतला आणि वयाच्या १७व्या वर्षीच पाहिली अटक झाली. १९५४ ते १९५६ मधे शालेय शिक्षणातील फी वाढ विरोधी आंदोलनाचे यशस्वी नेतृत्व केले. विदर्भ संघाच्या आंदोलनात त्यांनी लढाऊ कार्यकर्ता म्हणून विधानभवनावर मोर्चा नेण्यात महत्वाचे कार्य केले. १९६०च्या सुमारास जबलपुरात कु. उषा भर्गववर झालेला अमानुष अत्याचार व कु. कांता नावाच्या नवबौद्ध युवतीवर नागपूर येथे मुस्लिम गुंडाने केलेला बलात्कार याप्रकरणी आंदोलने अुभारून अपराध्यांना कठोर शिक्षा घडविण्यास यश मिळविले. सन १९६१-६२ मधे प्रादेशिक सेनेचे नागपूर विभागीय अधिकारी ले.क. इस्माईल यांच्या देशद्रोही कारवायांविरुद्ध जनआंदोलन अुभारून त्यांची पदोन्नती रोखली व बदली करावयास लावली. मुंबईत १९६४ मधे भरलेल्या जागतिक साई यूकॉरिस्टिक काँग्रेस विरोधी प्रखर आंदोलन अुभारले. हिंदु समाजातील प्रचंड प्रमाणात होऊ घातलेल्या धर्मांतरास आळा घातला आणि हिंदूंच्या ख्रिस्तीकरणाचा डाव अुधळून लावला. नागपूरला भरलेल्या विधानसभेच्या अधिवेशनावर दि. १८ नोव्हेंबर १९६४ ला विक्रमरावांनी मोर्चा आयोजित केला. त्याप्रसंगी त्यांना भारत संरक्षण कायद्याखाली ((DIR) डिफेन्स ऑफ इंडिया) अटक झाली. महागाई-धान्य टंचाई, बेकारी विरुद्ध आंदोलने, पूर्व पाकिस्तानातील हिंदूंच्या अमानुष कत्तलींविरुद्ध निषेध आंदोलन, १९६६ मधे गोवध बंदीसाठी नागपूरात 'शंकराचार्य प्राणरक्षा आंदोलन', इंग्रजी हटाव आंदोलन, पाचगणी येथील मॉरल रिआर्मामेंट आर्मी या संस्थेच्या नावाखाली राजमोहन गांधी यांनी परदेशी मिशनऱ्यांशी संधान बांधून

ठरविलेल्या ईसाईकरणाच्या गुप्त कारस्थानविरोधी प्रचंड जनजागृती आंदोलन, गुजरातमधील सिद्धपूर येथील मंदिर मुक्ती आंदोलन, मुंबईतील प्रभादेवीच्या सिद्धिविनायक मंदिरातील मुस्लिम विश्वस्त व पहारेकरी हटाव आंदोलन, १९७३ मधील सिमला करार विरोधी आंदोलन, वंदेमातरम् आंदोलन, अगर हिंदुस्तानमे रहेना होगा तो वंदेमातरम् कहेना होगा', १९८१ मधे कल्याण-भिवंडीतील शिवजयंती मिरवणुकीवरील बंदी हटाव आंदोलन, सन १९८६ मधे दिल्ली व मुंबई येथे पोपच्या भारतभेटी विरोधात निदर्शने अशा असंख्य आंदोलनात हिरीरीने लढा देऊन विक्रमरावांनी अनेकदा पोलिसांच्या लाठीमाराला सामोरे जाऊन त्यांनी अनेकदा कारावास भोगला.

## समान सामाजिक संहिता (कायदा)

हिंदूंच्या बाबतीत 'हम दो, हमारे दो' आणि मुसलमानांना मात्र 'हम पांच, हमारे पचीस' हे चालणार नाही, देशात 'समाज सामाजिक कायदा' (कॉमन सिव्हील कोड) लागू करावा यासाठी विक्रम सावरकरांनी प्रचंड जनआंदोलन केले आणि सर्वोच्च न्यायालयात रिट अर्जही केला. परंतु शासनाने प्रदीर्घ काळाने तो खारिज केला!! यासाठी विक्रमरावांनी तन-मन-धन वेचले. सर्वस्व पणाला लावले.

## 'महाराष्ट्र मिलिटरी स्कूल'ची स्थापना

विक्रमरावांनी स्वातंत्र्यवीरांचा सैनिकीकरणाचा संदेश कृतीत अुतरविला ते ठाणे जिल्ह्यात, तळवली - बारागाव, (टोकावडे) येथे सन १९९३ मधे 'महाराष्ट्र मिलिटरी स्कूल'ची शाळा काढून, सर्व क्षेत्रात ही शाळा आघाडीवर आहे. आजही महाराष्ट्रातील सैनिकी शाळांच्या उपक्रमांना विक्रमराव प्रेरणा आणि मार्गदर्शन देत आहेत. अडथळ्यांची शर्यत ओलांडून कामे करण्याची त्यांची क्षमता आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे सक्रीय सदस्य

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्या सार्वजनिक धर्मादाय न्यासा (ट्रस्ट)च्या स्थापनेसाठी आवेदन केलेल्या पहिल्या ५३ व्यक्तींपैकी, विक्रमराव अेक आहेत. दि. २९ डिसेंबर १९६६ला स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, दादर ला स्थापन झाल्यापासून आजमितीपर्यंत प्रत्येक कार्यकारिणीत ते सदस्य राहिले. राजकारणामुळे स्मारकाला त्रास होऊ नये या अुदात्त हेतूने प्रत्यक्ष सहभागापासून दूर. परंतु स्मारकाच्या आवश्यकतेनुसार वेळोवेळी सर्वपरी सहकार्य करीत आले. स्मारकाच्या उपक्रमांत आजही या वयात, प्रकृती साथ देत नसताना, सर्वतोपरी सहकार्य आणि मार्गदर्शन करीत असतात. अगदी नुकताच दि. १२ अेप्रिल २००९ला स्मारकात झालेल्या भाषाप्रभू पु.भा. भावे जन्मशताब्दि कार्यक्रमात सभेचे अध्यक्षस्थान भूषविले. (भावे यांनी 'मंदिर' हे पुस्तक विक्रमरावांना अर्पण केले आहे.)

वयाच्या ७८व्या वर्षीही शक्यतेनुसार सर्व ते कार्य करण्याची मानसिक सिद्धता त्यांची असते, जीवनगौरव पुरस्कारासाठी योग्य असे त्यांनी आजमितीपर्यंत स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या ध्येय धोरणांचा पुरस्कार करणारे कार्य केले आहे.

विचारांनी मोठी असलेली अनेक माणसं असतात पण आचरणानेही मोठी असलेली माणसे तुलनेने कमीच. आपला विचार सर्वप्रथम आपल्याच अंगी बाणवून तो आयुष्यभर आचरत राहाण्याइतकं अवघड जगात दुसरं काही नाही. आणि विक्रमराव आजही ते करीत आहेत ही त्यांची महानता.

गेली ४१ वर्षे सन १९६८ पासून 'प्रज्वलंत' मासिक प्रकाशित करीत असत. १९९२ पासून मी यथाशक्ती संपादनसहाय्य त्यांना केले. त्यावेळी संपादन कौशल्याचे मार्गदर्शन मला वेळोवेळी झाले. 'पुष्पासवे मातीस वास लागे' याप्रमाणे माझे व्यक्तिमत्व अुजळून गेले.

कालप्रवाहात खरे म्हणजे सगळेच वाहून जात असले, तरी आयुष्यातील महत्वाचे मार्गदर्शक पथ, चित्तथरारक, रोमांचक प्रसंग, लक्षात राहाण्याजोग्या महत्वाच्या व्यक्तिरेखा, संवेदनाक्षम मन आणि हळवे क्षण, स्मृतींचा सुगंध याच्या खुणा पुसायला काळसुद्धा असमर्थ ठरतो. आदरणीय, गुरुवर्य विक्रमराव सावरकरांसारख्या अद्वितीय व्यक्तिमत्वाचा मला कृपालाभ झाला आणि माझ्या कुटुंबाला सदैव त्यांचे सपत्नीक शुभाशीर्वाद मिळाले हे माझे परमभाग्य.

विक्रमरावांना त्यांचं राष्ट्रोपयोगी आणि समाजोद्धारक कार्य प्रभावीपणे पुढे सुरू असलेले, सावरकरांच्या राजनीतीच्या विजय झालेले प्रसंग आणि अखंड हिंदुस्तान झालेला 'याच देही याच डोळा' पाहायला मिळो ही परमेश्वरापाशी प्रार्थना. आणि त्यासाठी आरोग्यसंपन्न दीर्घायुष लाभो ही सदिच्छा आणि शुभेच्छा.

**लेखिका - डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे**

(दि.९ मे २००८ 'दैनिक सामना' वरून साभार)

✦✦✦

### मुखवटे व चेहरे

जग ही एक रंगभूमी
लिहून गेला शेक्सपियर कोणी
त्याची प्रचिती घेतेय मी
घरीदारी पदोपदी क्षणोक्षणी।।
बदलतात नाटके बदलतात पात्रे
रोजचे नाटक नवे अन् न्यारे
मुखवट्याआड दडवून चेहरे
वावरतात इथे संभावित सारे।।
एकपात्री आणि बहुपात्री
नाटक चाले दिवसा नि रात्री
मुखवटा विरुद्ध चेहरा ही कात्री
एकाची दुसऱ्याला नसे मुळी खात्री।।
अव्याहत चालणाऱ्या ह्या नाटकाला
अपवाद असे फक्त एकाचा
अजाण निरागस बालकाचा
बिनमुखवट्याच्या चेहऱ्याचा।।

**डॉ. सौ. वसुधा आपटे**

(पृ.६२६) **(विद्वांस)**

मुंबई व पुणे येथून रेल्वेने नेणारी राजेश रानडे यांची लोकप्रिय

# अंबाजोगाई दर्शन यात्रा

## सोबत परळी वैजनाथ

दर महिन्याच्या प्रत्येक शुक्रवार व शनिवारी निघते

आगाऊ बुकिंग किमान १५ दिवस अगोदर

सहल खर्च

रुपये-४३००/-१ एसी रेल्वे तिकीटासहीत

रुपये-३२००/-२ एसी रेल्वे तिकीटासहीत

**रुपये-२६००/-३ एसी रेल्वे तिकीटासहीत**

**रुपये १७००/- स्लिपर क्लास तिकीटासहीत**

सर्व खर्च समाविष्ठ

▸ ज्येष्ठ नागरिकांस सहल खर्चात 10% सवलत. ◂

खास पावसाळ्या निमित्त

करावळी दर्शन

# कोस्टल कर्नाटक

या मध्ये

कारवार-सदाशीवगड-अंकोला-गोकर्ण

इडगुंजी-मुर्डेश्वर-सिरसी-बनवासी

**मागोड व जोग फॉलस्**

इत्यादी स्थल दर्शन होईल

**सहल खर्च रु. ४३५०/-**

Rail fare extra as/class

**दि. २२ ते २६ जुलै,५ ते ९ ऑगस्ट**

फक्त पत्ते (Playing cards) खेळणाऱ्यांकरीता..

# RUMMY TOUR

दर महिन्याच्या पहिल्या शनिवार/रविवारी रमी/ब्रिज खेळणाऱ्यांकरीता

मुंबई पासून १०० कि.मी. परिसरात दोन दिवसाची कार्निव्हल .

शनिवारी सकाळी निघून रविवारी संध्याकाळी परत

**Rs: 21,000/- for full year** (12 tour)

**Rs: 11,000/- for half year** (6 tour)

Including night stay,breakfast-lunch-dinner& travelling

महिलांसाठी स्वतंत्र ग्रुप

मडीकेरी दर्शन

# कुर्ग

४ रात्र ५ दिवस

सोबत तळकावेरी नागरहोळे

**सहल खर्च रु. ७५००/-**

Rail fare extra as/class

**दि. २६ ते ३१ जुलै,९ ते १४ ऑगस्ट**

नोंदणी व अधिक माहिती करीता संपर्क

आयोजक राजेश रानडे

अनोळखी जगाची ओळख

# TOURWAYS

022 65 281 281

92232 73496

C-305 Palm Acres.M.P.Rd,Mulund east Mumbai 81

www. tourways.in

# माहेरच्या अंगणात

**लेखिका - सौ.निलिमा विष्णु विद्वांस, माणगांव**

आमचे पांचजणांचे पंचकोनी कुटुंब सुखात नांदत होते. आई-वडिल, दोघी बहिणी, एक मोठा भाऊ. आईकडून चांगले संस्कार, वळण, शिकवण दिली जात होती. आणि त्याची पाळणूकही होत होती. सणा-वारांचे महत्व कळण्यासाठी ते पारंपारीक पद्धतीने साजरे होत होते. त्या त्या सणांचे गोड खाणे अंगीलागत होते. एकमेकांवर प्रेम करून त्यांचा आदरही राखला जात होता.

आमची आई अतिशय प्रेमळ त्यामुळे तिच्या भाच्या, पुतण्या शिवाय जोडलेल्या अशा साऱ्या माहेरासाठी सतत आमच्याकडे येत होत्या. सर्वांची जातीने विचारपूस होई. खाण्या-पिण्याची चंगळ होई. महिनाभर राहून छानपैकी तब्येत कमावून, उन्हाळी वाळवण, गोड शिदोरी घेऊन तृप्त मनाने सासरी जात. आई-वडिल ''देते'' असल्याने हे सारे शक्य होत होते. पुन्हा दोघांना देण्यातले समाधान फार महत्वाचे वाटे. ह्या शिवाय त्यांना कशाचीही अपेक्षा नसे. देणाराच देत असतो. मग तो गरीब असला तरीही. तोच ''देता'' गुण आम्हां तिन्ही भावंडात उतरला आहे. तर बालपणी असे भरलेले आमचे घर होते. ते बघण्याची आम्हाला सवय होती. आम्ही आनंदात नांदत होतो. पण.....

पण नियतीच्या मनात वेगळेच शिजत होते. आम्ही लहान वयाचे असतानाच एक कोन पूर्णपणे निखळला. आम्हांला आमची आई सोडून गेली. जे घर सतत माणसांनी गजबजत होते ते पूर्णपणे शांत झाले. आपले माहेरपण संपले ह्या जाणिवेने माहेरवाशी सासरीच रमल्या. त्यांना आम्हां लहान भावंडांची, आमच्या वडिलांची आठवणही येत नव्हती. आता आयते मिळणार नाही उलट जबाबदारी पडली तर.... ह्या विचारांनी साऱ्यांनी आमचे घर पूर्णपणे बंद केले. आम्ही तीन भावंडं व नाना इतकेच आमचे जग राहिले. अर्थात आमच्या नानांनी आमची अतिशय सुंदर रितीने देखभाल केली. दोन्ही भूमिका त्यांनी चांगल्या तऱ्हेने पार पाडल्या.

हितचिंतकांनी त्यांना दुसरे लग्न करण्याचा सल्ला दिला. फक्त चाळीशीच तर आहे. सर्वच बायका वाईट नसतात. हाही मोलाचा सल्ला दिला. पण नानांनी दुसरे लग्न केले नाही. मुलांना सावत्रपणाचा जाच नको. घरात वादळे नको आणि विषाची परिक्षाही नको. त्यापेक्षा मुलांना चांगले वळण लावून त्यांना चांगल्या मार्गाला लावावे असे ठरवून ते व्रत त्यांनी घेतले.

सारेसण गोडधोड आणून साजरे केले जात होते. मुलं लोकांकडे जाऊन दीनवाणी होऊ नयेत म्हणून आटोकाट प्रयत्न करीत होते. कुणाचीही खोटी सहानुभूती नको. साऱ्यांनीच ताठ मानेने जगले पाहिजे हे त्यांनी आम्हांला कळवळून सांगितले. आणि आम्ही ते आत्मसात केले. त्यामुळे तेही समाधानी होते. मी बारा वर्षाची असल्याने इतर आयांचे मुलींवरील प्रेम, लाड पाहून मला खूप दु:ख होत होते आई नसल्याचे.

आई गेल्यानंतरच्या संक्रांतीला आमच्या नानांनी आम्हांला संध्याकाळी जवळ घेतले. प्रत्येकाच्या तोंडात तिळगुळ भरविला आणि सांगितले ''बाळांनो तुमची आईही मीच आहे. तुमची सगळी सुखदु:ख, अडचणी मला सांगा. माझे करणे कमी पडत असेल तर तेही सांगा. कांही हवे असले तर तेही मागा ते मी पुरवीन. आपसात भांडलात तरी रोष धरू नका लगेच सारे विसरून प्रेमाने वागा.'' असे म्हणून मायेने आम्हांला थोपटले. माझ्या लहान बहिणीचे अवघे सहा वय असल्याने तिला ह्याचा अर्थ काही कळत नव्हता. ती नानांच्या मांडीवर बसून तिळगुळ खाण्यात मग्न होती. आणि मजेत पाय हलवून आपला आनंद व्यक्त करीत होती. पण बारा आणि पंधरा वर्षाची आम्ही भावंडं पित्याचे प्रेम, दु:ख समजू शकत असल्याने आम्हांला रडे आवरणे शक्य झाले नाही आणि वडिलांनाही अश्रू आवरणे कठीण गेले. तेव्हापासून आम्ही मोठे होईपर्यंत असाच तिळगुळ प्रत्येक संक्रांतीला आम्हांला मिळत होता. आम्ही भाग्यवान म्हणूनच आम्हांला असे प्रेमळ वडिल मिळाले ना?

काळ कुणासाठी थांबत नाही. तो सतत पुढे सरकत असतो आणि आपले वयही. त्याप्रमाणे मी लग्ना एवढी झाले. आणि माझे लग्न झाले. ते त्या सर्वांना खूप जाणवले. माझी उणीव वडिल, भाऊ, बहिण ह्यांना तर भासत होती. ते बोलून दाखवित होते पण घर, झाडे, बगीचा ह्यांनाही माझा विरह जाणवत होता. रोज आपल्याला गोंजारणारी, प्रेमाने बोलणारी ताई कुठे गेली? असा प्रश्न त्यांना पडत असावा पण त्यांची भाषा आपल्याला येत नसल्याने आपल्याला त्यातील गम्य समजत नव्हते. मग माहेरी गेल्यावर त्यांच्याजवळ जाऊन त्यांना प्रेमाने ती गोंजारीत असल्याने त्यावेळेस त्यांचा आनंद सारा बगीचा डोलावून व्यक्त करीत असत. सहवासाने असे नाते जुळत असते हेही खरे आहे. पण परत सासरीही परतणे भाग होतेच ना? मग जाताना पुन्हा हात लावून, मी गहीवरून झाडांना सांगे मी परत येईनच. पण तुम्ही आनंदाने डोलत रहा. सुवासाची बरसात करीत रहा.

लग्न झाल्यावर तर आईची खूपच उणीव भासत होती. नववधूंच्या माहेरी मंगळागौरी होत असत. तेव्हा वाटे आपली आई असतीतर तिनेही मोठ्या थाटाने ही हौस केली असती. मग

मात्र डोळे तुडुंब भरून येत असत. शिवाय पहिले बाळंतपणही लाडात झाले असते. पण.... आई नसल्याचे शल्य वयाची पन्नाशी उलटली तरीही बोथट झाले नाही. अर्थात हाही नशिबाचा भाग असतो हेही खरेच आहे. पण नानांकडून कांही कमी पडत नव्हते. ते माहेरपण कौतुकाने करीत होते. नातवंडांचे ही लाड करीत होते जावयाचा योग्य तो मान राखला जात होता. तसेच सुनेचीही हौस करीत होते. तिच्या कष्टांची जाण होती. दुसरे जावईही प्रेमाने न्हाऊंन निघत होते. असे सारे चालले होते. पण ईश्वरीलीला अगाध आहे. आपल्याला अज्ञात आहे. कारण संध्याकाळी, रात्रीही सर्वांशी बोलून, नातवाला खाऊ देऊन रात्री ते झोपले. आणि पहाटे उठून पाणीही प्यायले थोडावेळ बसले. सुनेशी थोडे बोलणे झाले तूं उठून त्रास घेऊ नकोस असे सांगून ते झोपले ते कायमचे झोपले. नाना देवाघरी गेले. बोलता चालता गेले. आणि आम्ही सारे खऱ्या अर्थाने पोरके झालो. आमचा माहेरचा आधारस्तंभ गेला. अगदी लहान वयात आईविना आम्ही होतो. पण नानांचा भक्कम आधार होता. म्हणूनच आम्ही सुखरुप राहीलो. आनंदाने जगलो. पण त्यांचा मृत्यु सहन झाला नाही. माहेर संपले.

वयाची पन्नाशी उलटून गेली. तरी प्रत्येक संक्रांतीला ते दृश्य ताजे होऊन दिसते. त्या आठवणींने खूप रडते आणि त्यांना सांगते ''नाना परत याना तिळगुळ द्यायला. याल का?''

''ओ जानेवाले हो सके तो लौटके आना।''

अशा बऱ्याच आठवणी माहेरच्या असतात. त्या आठवणींचा रांजण कधीच रिकामा होत नसतो. अगदी खरे ना?

**सौ. निलीमा विष्णू विद्वांस**
विकास कॉलनी, मराठी शाळेजवळ,
मु.पो.ता. माणगाव. जि. रायगड
दूरध्वनी - ०२१४०/६९५७६७

✦✦✦

## मानसन्मान

**सी.ए. श्री. मुकुंद श्रीपाद मराठे**
चार्टड अकौंटन्सी परीक्षेत यशस्वी

रत्नागिरी येथील आपले आजीव सभासद (क्रमांक ५९८) मुकुंद श्रीपाद याने (पृष्ठ ४६) मे २००८ मध्ये झालेल्या चार्टर्ड अकौंटन्सीच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन उत्तम यश संपादन केले.

त्यांचे प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण रत्नागिरी येथेच झाले आहे. त्यांनी बारावी (वाणिज्य) परीक्षेत फाटक कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रथम क्रमांक मिळविला होता. रत्नागिरी येथेच त्यांनी सी.ए.ची आर्टिकलशिप पूर्ण केली. रत्नागिरीसारख्या ठिकाणी कि. जेथे सी.ए. कोर्ससाठी कसलीही सुविधा व मार्गदर्शन उपलब्ध नाही अशा ठिकाणी राहून हा कोर्स पूर्ण केला हे विशेष.

गेली तीन वर्षे धाकडे बंधू ॲडव्होकेट अनिरुद्ध श्रीपाद यांचे समवेत कर सल्लागार म्हणून व्यवसाय करीत राहून त्याजबरोबर परीक्षेचा अभ्यासही व्यवस्थितपणे केला.

तो या यशाचे श्रेय त्याचे आईवडील, गुरु कै. वसंतराव पाटील तथा दादा व धाकटे बंधू अनिरुद्ध श्रीपाद यांना देतो.

आता तो पूर्णपणे सी.अे.चा व्यवसाय रत्नागिरीयेथे करीत आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा त्याचे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.



कु. पूजा चंद्रशेखर मराठे ही डिसेंबर २००८ च्या ICWA (Cost Accountant) या परीक्षेत चांगल्या गुणांनी अुत्तीर्ण झाली. कु.पूजा ही श्री. चंद्रशेखर धुंडिराज मराठे, पुणे यांची सुकन्या आहे. मराठे प्रतिष्ठान द्वारा कु. पूजा चे हार्दिक अभिनंदन.

◉◉◉

कु.शर्वरी शरद मराठे हिने बारावीच्या परीक्षेत ८५ टक्के मार्कस् मिळवले. कु.शर्वरी ही मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीतील सदस्या सौ.वर्षा शरद मराठे, गोरेगाव यांची सुकन्या आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा कु.शर्वरीचे हार्दिक अभिनंदन. असेच भरघोस यश तिला पुढील शिक्षणातही मिळो ही शुभेच्छा.

◉◉◉

## नांदा सौख्यभरे

बिंबल - सत्तरी - गोवा येथील सदस्य श्री. सीताराम य. मराठे व सौ. मनिषा सी. मराठे (पृ.५२०) यांचा सुपुत्र डॉ. विश्वनाथ याचा विवाह नाशिक येथील डॉ. अनंत भा. जोशी व सौ. जयश्री अ. जोशी यांची सुकन्या सौ. कां.डॉ. राजश्री हिच्याबरोबर शुक्रवार दि. १५ मे २००९ला, दुपारी १२ वाजून ३५ मिनीटांच्या शुभमुहूर्तावर श्रीदेव रवळनाथ महालक्ष्मी देवस्थान, शिरोडवाडी, गोवा येथील कार्यालयात संपन्न झाला. नवविवाहितांना मराठे प्रतिष्ठानद्वारा शुभेच्छा (डॉ. विश्वनाथ हे 'हितगुज'चे भूतपूर्व संपादक श्री. लक्ष्मण शंकर (पृ.५२०) यांचे पुतणे आहेत.)

# माझी डोकेदुखी

**लेखक : श्री. वि.म. मराठे (पृष्ठ २३५), सांगली**

गेला महिनाभर मी डोकेदुखीने बेजार होतो. रोज सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास एका बाजूचे डोके दुखण्यास सुरुवात होई. ज्या अर्थी एकाच बाजूचे डोके दुखते त्या अर्थी ती अर्ध शिशिच असणार असे निदान झाले. लहानपणी आम्ही डोके दुखत नसले तरी अर्धे डोकेदुखण्याचे सोंग करीत असू. त्यावेळी उपाय म्हणून पहाटे पहाटे पेढे खाण्यास मिळत असत. पण आत्ताची डोकेदुखी खरी होती. रोजच्या डोकेदुखीमुळे रोज एकादी गोळी घेऊन ऑफीसला जावे लागत असे. माझ्या या दुखण्याची बातमी सगळीकडे पसरली होती. तरी ती ऑफीसमधील देशपांडेंपर्यंत पोचली नव्हती.

'साहेब, तुम्ही महिनाभर हे सोसताय, मला कां नाही सांगितलत? माझ्याकडे जालीम औषध आहे. आत्तापर्यंत मी अनेकांना बरे केले आहे. आणि ते सुद्धा अगदी निशुल्क! तेंव्हा तुम्ही तयार असाल तर तुमच्यावर उपचार करण्याची मला संधी द्या.'

आमच्यी ऑफीसमधील देशपांडे म्हणजे एक ऑलराउंड प्राणी! अकौंटचे महत्त्वाचे टेबल त्याच्याकडे असल्यामुळे सर्वजण त्याला धरून असत. त्याच्याकडील देशी औषधे तो बऱ्याच जणांना देतो हे मी ऐकून होतो. तेंव्हा त्याला माझ्यावर उपचार करण्याची परवानगी देऊन बघावे म्हणून मी म्हटले, ''रावसाहेब, तुम्ही खात्री देत असाल तर माझ्यावर उपचार करण्यास माझी हरकत नाही. तुमच्या औषधांची काय किंमत असेल ती माझ्याकडून घ्या.''

''साहेब, मी एका झाडाच्या पाल्याचा रस तुमच्या नाकांत घालतो. पांच मिनिटांत सर्व सर्दी बाहेर पडून जाईल व तुम्ही मोकळे व्हाल. मला फी वगैरे नको. बरे वाटले कीं एक कप चहा द्या म्हणजे झाले.'' या प्रमाणे त्यांनी सांगितल्यावर दुसरू दिवशी त्यांनी माझ्या बंगल्यावर यायचे ठरले.

दुसरे दिवशी माझ्या घरी आल्यावर त्यांनी एक चमचा मागून घेतला व एका कोपऱ्यांत जाऊन खिशांतून आणलेल्या पाल्याचा रस चमच्यांत काढला. मला कोणत्या बाजूचे डोके दुखते ते विचारले. मी उजव्या बाजूचे दुखते असे सांगितल्यावर म्हणाले ''आता मी तुमच्या डाव्या नागपुडीत रसाचे दोन थेंब टाकतो. तुम्ही उताणे निजा.''

मी तसे करताच त्यानी चमच्यातील रस नाकांत ओतला आणि रस नाकांत जाताच एवढी आग झाली कीं मी मेलो मेलो असे म्हणत उठून बसलो. पुढील अर्धा तास मी नाकपुडीतून येणारा द्रव, नाक व घसा यांत होणारी आग, यांच्याशी सामना करीत होतो. शेवटी थोडे तूप नाकांत घातले तेंव्हा कुठे मी बोलण्याच्या मन:स्थितीत आलो. माझी ही अवस्था बघून देशपांडे ऑफीसची वेळ झाली म्हणून निसटू लागले. मला त्या दिवशीं ऑफीसला जाणे शक्यच नव्हते. मी त्यांच्याबरोबरच रजेचा अर्ज पाठवून दिला.

अशा रितीने माझ्या अर्ध शिशिच्या उपचाराची सुरवात झाली. आमच्या कॉलनीमधील सर्व डॉक्टरांची औषधे घेऊन झाली. रोज रात्री वाफ घेणे, नाकांत निरनिराळे थेंब घालणे चालू होते. एवढे करूनही गुण येईना, तेंव्हा शहरांत जाऊन ई.एन.टी सर्जनना दाखववे असा सल्ला मिळाला व फॅमिली डॉक्टरांची चिठ्ठी घेऊन इ.एन.टी. सर्जनच्या दवाखान्याच्या पायऱ्या चढलो. केस पेपर काढून नंबर लावला व वाट बघत बसलो. तेंव्हा डॉक्टरांच्या रुममधून अेकेक पेशंट नाकांत दोन दोन काड्या घालून बाहेर येत होता. इतर वेळी मी हे दृश्य बघून हसलो असतो पण 'आपल्यावर ही पाळी येणार नाही ना? अशा विचाराने भिती वाटू लागली. तेंव्हा हा काय प्रकार आहे हे तेथील रिसेप्शनिस्टला विचारले. तेंव्हा 'ज्यांचे पंक्चर करावयाचे असते त्यांना नाक बधीर करण्यासाठी असे नाकांत बोळे घालून बसवून ठेवतात' असे समजले.

मला नाही ना पंक्चर करणार? या माझ्या प्रश्नावर 'ते डॉक्टर तपासून ठरवतील' असे उत्तर मिळाले.

थोड्याच वेळांत माझा नंबर लागला. मी डॉक्टरांच्या पुढ्यातील स्टुलावर बसलो. त्यांच्या तोंडावर पट्टी बांधली होती. कपाळावर आरसा उलटा करून ठेवला होता. त्यानी मला काय होते ते विचारले. मी त्यांना सर्व हकिगत सांगितली त्यांनी माझ्या नाकांत दोन्ही बाजूला दोन चिमटे घालून ते फाकविले व कपाळावरचा आरसा डोळ्यावर घेऊन माझ्या नाकांत बघितले. जवळच्या कागदावरच्या आकृतीवर कांहीतरी खरडले व माझ्या नाकांतील हाड वाढले आहे असे सांगितले. यावर 'ते हाड कापावे लागेल' असे ऐकताच आता माझ्या नाकाचे काय होणार या काळजीने मी घाबरलो. आजपर्यंत मी या सरळ नाकाचा अभिमान बाळगत होतो. हाड कापल्यावर त्याचा आकार कसा होईल याची कल्पनाच करता येईना. माझ्या मनातील भिती डॉक्टरांनी ओळखली असावी. ते म्हणाले ''असे घाबरू नका. हाड कापायचं ते आम्ही आतून तासून काढतो. तुमच्या नाकाचा आकार कांही बदलणार नाही. तुम्ही तयार असाल तर बाहेर पैसे भरा व तारीख घ्या. ऑपरेशन अर्धा तास असेल व एक दिवस रहावे लागेल.''

आता दवाखान्याची पायरी चढलोच होतो ऑपरेशनला तयार झालो. व अेके दिवशी अगदी छन्नी हातोडा या आयुधानी

माझ्या नाकाच्या हाडाचे तास काढले ते अगदी कपाळापर्यंत! बरीच औषधे लिहून दिली ती घेतली. पण अर्धशिशी कांही कमी झाली नाही. तिच्याबरोबर नवीन पाहुणा मात्र आला. ज्या ठिकाणी पडदा तासला होता त्या ठिकाणी सूज येऊन ठणका चालू झाला. त्यावर पुन्हा अँटीबायोटीक्स, पेन किलर यांचा मारा सुरू ठेवावा लागला.

नाकाचे हाड वाढण्याचा आणि माझ्या अर्धशिशीचा काही संबंध नव्हता हे अशा प्रकारे सिद्ध झाल्यावर आता परत दुसऱ्या डॉक्टरांच्या दवाखान्याच्या पायऱ्या चढलो. त्यांना सर्व हकिगत सांगितल्यावर त्यांनीही पुन्हा माझे नाक फाकवून आंत बघितले व म्हणाले 'मी चिठ्ठी देतो. तुमच्या डोक्याचा एक्स रे काढून आणा. म्हणजे सायनसायटीस आहे कां ते समजेल. चक्रव्यूहांत शिरलोच होतो. सुटका नव्हती. एक्स रे साठी जायचे ठरले. माझ्या डोक्याचा एक्स-रे म्हणजे सगळीकडे थट्टेचा विषय झाला. ''तुमच्या डोक्याचा एक्स-रे कशाला पाहिजे? त्यात कांही नाही हे सर्वांना ठाऊक आहे'' असे म्हणून मित्रमंडळी माझी चेष्टा करू लागली.

एक्स रे काढण्यासाठी गेलो, तेथे मला मशीनकडे डोक्याचा भाग करून समोरच्या फ्रेमवर कपाळ टेकविण्यास सांगितले. मला शंका आली. मी म्हणालो 'अहो, माझ्या कापाळाचा फोटो काढायचा आहे. डोक्याचा नाही.' तेंव्हा तो टेक्निशियन म्हणाला, डोक्याकडून फोटो काढला म्हणजे कपाळाचा निघतो. तुम्ही उभे रहा. हालू नका.''

संध्याकाळी फोटो मिळाला तो घेऊन डॉक्टरांकडे गेलो. त्यांनी सायनसचे निदान करून पंक्चर करून घेण्याचा सल्ला दिला. त्यांनी 'पंक्चर' म्हणताच माझ्या डोळ्यापुढे, 'मी नाकांत दोन काड्या घालून बसलो आहे' असा सीन आला. माझ्या नाकावर पंक्चरचा प्रयोग झाला. हे ओघानेच आले. नाकांत प्रथम एक जाड सुई सरकवून तिला खालून ठोसा मारताच कपाळाच्या हाडाला भोक पडले. त्या सुईमधून परत दुसरी सुई घालून सर्व कपाळ धुवून घेतले. ते पाणी घशांत आले. तेंव्हा जीव घाबरा झाला. या प्रयोगानंतरही माझी अर्धशिशी थांबली नाही. मी परत दाखवायला गेलो की डॉक्टर पंक्चर करण्याचा सल्ला देत.

''माझे कपाळ कोरडे पडते आंत घाण नाही. पंक्चर नको हे माझे म्हणणे! पण त्या कडे दुर्लक्ष होई आणि आम्ही काय करतो ते चांगल्या करताच करतो' असे डॉक्टरांचे म्हणणे! ते ऐकून पुन्हा पंक्चरचा अनुभव घेणे भाग पडे. असे चार पांचवेळा अगदी मोठ्या दवाखान्यांत सुद्धा झाल्यावर पंक्चर या शब्दाची मी धास्ती घेतली. नुसता तो शब्द जरी ऐकला तरी माझ्या अंगावर काटा उभा राहू लागला. या पुढे काय दुखेल ते सोसायचे. पण कुणाला माझ्या नाकाला व डोक्याला हात लावून द्यायचा नाही हे मी ठरवून टाकले. अशी दहा वर्षे गेली. माझी अर्ध शिशी तशीच होती. या काळांत मला निरनिराळ्या औषधांची नांवे पाठ झाली. औषधाचे नांव ऐकले की मी त्यांत काय काय घटक आहेत ते सांगू शकत होतो. मेडीकलच्या दुकानांत औषधे कशी ठेवतात ते मला माहित झाले होते.

अेके दिवशी माझ्या स्वप्नात सायनस नांवाचा राक्षस आला. तो म्हणाला ''साहेब, तुम्हाला त्रास देण्याची माझी मुदत संपली. मी जात आहे. कधीतरी सणावारी भेटेन!'' अशा रितीने माझे सायनसचे दुखणे आपोआप कंटाळून गेले.

या दहा वर्षाच्या अनुभवावरून मी आता लोकांना सायनसवर उपचार सांगत असतो. अगदी फ्री मधे!

**लेखक :श्री.वि.म. मराठे**
(पृ.२३५)
पद्मश्री, महाराष्ट्र बँकेजवळ,
विश्रामबाग, सांगली ४१६४१५
फोन:०२३३ २३०००७२.

✦✦✦

**Why do we work and pay tax in India ?**

A Bangladeshi refugee arrives in Assam as a new immigrant in India. He stops the first person he sees walking down the street and says, "Thank you Mr. Indian, for letting me in this country, and giving me free housing, food, free medical care, affirmative action job and free education!"

But the passer-by says, "You are mistaken, I am a Sri Lankan. I'm just here for the free medical care."

The man goes on and encounters another passer-by "Thank you for having such a beautiful country here in India!"

The person says, "I'm not Indian. I'm from Nepal. I'm just here for the free housing."

The new arrival walks further and the next person he sees he stops, shakes hands and says, "Thank you for the wonderful India!"

That person puts up his hand and says, "no, no, I am not from India. I am from Bhutan ... I'm just here for the free education."

He finally sees a lady and asks suspiciously, "Are you an Indian?

She says, "No, I am from Pakistan!"

This guy is now puzzled and asks her, "Where are all the Indians ?"

The Pakistani lady looks at her watch, shrugs, and says..."Probably at work!"

✦✦✦

# वास्तु शास्त्र

**लेखक: श्री.अनंत वि मराठे,**
ज्योतिष विशारद वास्तुसल्लागार
लुइस वाडी, ठाणे(प), ४००६०४
मोबाईल: ९८२१५४४५६३

असावे घरकुल आपुले छान हि आपली सर्वांची कल्पना सत्यात उतरण्यासाठी मनुष्य आयुष्यातली सर्वात महत्त्वाची वर्षे खर्च करतो. २१व्या शतकात एकत्र कुटुंब पद्धती (Joint Family OR Nuclear Family) तून असा प्रवास सुरु असल्याने प्रत्येकजण आपल्या ऐपतीप्रमाणे सोइप्रमाणे घर किंवा जागा शोधत असतो.

जागा आणि घर हे दोनही शब्द खूपच बोलके आहेत. जागा म्हणजे झोपु नका सतर्क रहा आणि वास्तु म्हणजे घर होईपर्यंत माणसाला एकप्रकारची घरघर लागलेली असते.

जसे कुठलेही काम होण्याकरता आपण मुहुर्त किंवा चांगली वेळ हि पंचांगाच्या पाच अंगांनी बघतो (नक्षत्र, तिथी, वार, कारण आणि योग) तसेच रहाण्याचे घर चांगले लाभण्यासाठी सुद्धा पंचमहाभते, अष्टदिशा, पयतत्व, विद्युत चुंबकिय उर्जा वैश्विक किरण, गुरुत्वाकर्षण, जडत्व ह्या पाच अंगांनी विचार करणे आवश्यक आहे आणि ह्या पाच भौतीक अंगांचा विचार म्हणजेच वास्तु शास्त्र.

आपले मानवी शरीर ही सुद्धा आपल्या आत्म्याची वास्तु आहे. हे शरीर सुद्धा काही नियमांनी बांधील आणि अजुनही एक चमत्कार आहे. मग जिथे अनेक एकापेक्षा जास्त शरीरे रहाणार आहेत ते घर अथवा वास्तु सुद्धा निसर्गाशी संतुलन साधणारी नसेल तर त्यात रहाणाऱ्या शरीरांना आणि पर्यायाने आत्म्यांना त्याचा बरी वाईट झळ पोहचणारच.

अधुनिक विज्ञान वादाच्या मुद्यात सुद्धा प्रत्येक अणुच्या भोवती फिरणारे प्रोटोन आणि नुट्रान हे एका सम प्रमाणातच फिरत असतात.

आहनरचाहनच्या Relativity Theory मध्ये सुद्धा $E=MC^2$ म्हणजे कोणतीही मोठी वस्तु लहान वस्तुवर प्रभाव टाकतच असते. त्यामुळे घरातील वस्तुंच्या रचनेचा आपल्यावर प्रभाव पडतच असतो.

चुंबकिय शक्ती उत्तर दक्षिण असते आणि घन म्हणजे तो श्रण सकारात्मक आणि नकारात्मक (Positive) आणि (Negative) असते. परंतु कोणताही विद्युत प्रवाह हा जर Positive Positive कि Negative Negative जोडल्यास निर्माण होत नाही त्याकरता एक Positive आणि एक Negative (श्रण) उर्जाचीच आवश्यकता असते. म्हणून झोपताना आपले डोके (Positive) हे जर उत्तरेकडे (Positive) ठेवले तर पाय दक्षिणेकडे (Negative) दक्षिणेच्या Negative शक्तीशी उर्जा निर्माण करू शकत नाहीत. परंतु आपण जर दक्षिणेकडे (Negative उर्जाकडे) डोके ठेवले (Positive) तर उत्तरेकडे (Positive) उर्जाकडे पाय Negative शक्ती एकात्मता पडून मेंदुला चालना मिळते. म्हणून दक्षिणेकडे पाय करून झोपू नये असे आपले पुर्वज पूर्वीपासून सांगत आले आहेत. अशी अनेक शास्त्रीय रहस्ये आपल्या परंपरेत दडलेली आहेत.

ब्रह्मांडातील शुभ लहरी Cosmic Rays ह्या उत्तरपूर्व दिशेकडून येतात आणि म्हणूनच ह्या दिशेला वास्तुशास्त्रात अनन्य साधारण महत्त्व आहे. म्हणून देवघर इशान्य दिशेलाच हवे.

निसर्गामध्ये पंचमहाभुते म्हणजे अग्नी, पृथ्वी, वायू, जल आणि सर्व व्यापी आकाश तत्त्व अशी आहेत. ह्या प्रत्येक तत्त्वाशी वास्तुचे संतुलन असणे आवश्यक आहे कारण मनुष्य देह हा सुद्धा ह्याच पंचतत्त्वानी बनलेला आहे. म्हणूनच देह, वास्तु आणि निसर्ग ह्यांच्या पंचतत्त्वांचे संतुलन बिघडते म्हणजे वास्तु मध्ये किंवा Contradiction दोष निर्माण होऊन त्याचे बरे वाईट परिणाम दिसू लागतात. जेव्हा स्वयंपाकघर अग्नेय दिशेला असावे असे आपण म्हणतो त्याला शास्त्रीय आधार आहे. पूर्व आणि दक्षिण दिशेमधून सकाळची सुर्यकिरणे हि अल्ट्राव्हायोलेट (UV) असतात. त्यांच्या पासून निर्जंतुकिकरण आपोआप होते. म्हणून स्वयंपाक करताना त्या किरणांचा उपयोग निर्जंतुकिकरण करता होतो. परंतु आपण पाणी शुद्ध करण्याकरता UV वॉटर प्युरीफायर बसवून घेतो. निसर्गातले हे गुण आपल्याला अंधश्रद्धात्मक वाटतात. असेच इतर दिशांनाही संतुलन ठेवले असता त्याचा आपल्या मनावर, आरोग्यावर परिणाम होतो. अग्नेय दिशेला जर झोपण्याची खोली असेल तर सूर्याच्या बारा वाजेपर्यंतच्या उन्हाने तापलेली खोली आपल्याला शांत झोप न लागू देता चिडचिड निर्माण करेल.

ज्योतिष शास्त्राप्रमाणे कुंडलीतील योगाप्रमाणेच जर घटना घडणार असतील तर वास्तुशास्त्रामुळे कसे त्रास होतील असाही प्रश्न सर्वसामान्य माणसाच्या मनात येऊ शकतो. तो रास्तही आहे. परंतु

एका वास्तुत वेगवेगळ्या कुंडली असलेले लोक रहात असतात आणि वास्तु ज्याच्या नावावर आहे त्याला वास्तुदोषांचा जास्त त्रास होतो. तसेच कुंडली अथवा ग्रहस्थिती हे प्रारब्ध आहे आणि आपण बनवलेली वास्तु हे आपले कर्म आहे. जे प्रारब्धात आहे ते पूर्णत्वाने मिळवायचे असेल तर कर्माची (वास्तुची) साथ असणे आवश्यक आहे.

२१व्या शतकात आणि नगरपालिकेच्या नियमात सर्वांना वास्तु वास्तुशास्त्राच्या नियमांनुसार मिळणे अवघड नव्हे तर अशक्यच असत मग हे दोष जाण्याकरता प्रचंड खर्च करून तोडफोड करून वास्तुदोष निवारण करणे हि तर अशक्य गोष्टच आहे. म्हणूनच सध्याचे प्रगत वास्तुशास्त्र हे बदल आणि उपाय करून वास्तुदोष निवारण करण्यास मदत करते. आणि आज भारतातील नव्हे तर जगातील अनेक कुटुंब ह्या पद्धतीचा फायदा घेऊन वास्तुदोष निवारण करत आहेत.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे वास्तुत किंवा घरात सतत शुभ बोलणे आवश्यक आहे कारण वास्तु म्हणजे तथास्तु.

✦✦✦


**नवरा माझा राशीला**

अेक तासाचा मनोरंजक कार्यक्रम
सादरकर्ते श्री. अनंतराव मराठे
संपर्कासाठी पत्ता - श्री. अनंत विष्णु मराठे.
१०६, सोळंकी अपार्टमेंट, लुईसवाडी, ठाणे (वेस्ट) पिन-४००६०४.
मोबाईल - ९८२१५४४५६३.


## चित्पावन मराठे परिवाराने राजकारण सुधारण्याचा प्रयत्न करावा : न्यायाधीश नरहरी मराठे

### मराठे परिवार ९वे संमेलन : दोनशेपेक्षा अधिक सदस्य उपस्थित

कारवार, ता. ७: ''बाळ गंगाधर टिळक, वासुदेव बळवंत फडके, वीर सावरकर अशा अनेक स्वातंत्र्यसेनानींनी स्वातंत्र्य संग्रामात आपले सर्वस्व झोकून दिले. त्या त्यागाची आठवण प्रत्येक चित्पावनाने आपल्या उराशी सदैव बाळगावी व पुन्हा एकदा राजकीय घडामोडीत स्वत:ला झोकून देत आजच्या कुलषित राजकारणाला चांगले वळण लावून खऱ्या अर्थाने लोकशाही टिकविण्याची खटपट करावी. ती आज काळाची गरज असल्याचे प्रतिपादन बेळगावचे न्यायाधीश नरहरी मराठे यांनी केले. मराठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे आणि अुपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस यांनी संमेलनाला शुभेच्छा दिल्या.

कार्कळ तालुक्यातील 'दुर्ग' येथे भरलेल्या अखिल भारतीय (चित्पावन) मराठे परिवाराच्या नवव्या संमेलनाचे उद्घाटन करून ते बोलत होते. चित्पावनांनी, मराठ्यांनी तुडविला नाही असा कोणताही प्रांत नाही. मग तो व्यावसायिक असो, देशरक्षणासाठी असो किंवा समाजसेवेचा असो. जे काही करणे ते परिशुद्ध आणि प्रामाणिकपणे करणे. त्या दृष्टीने मराठे परिवाराने अशा संमेलनाचेआयोजन करून एकजूट व विकासात हातभार लावला आहे. हे सत्य कौतुकास्पद आहे.

तीन दिवसांच्या या संमेलनात दुर्ग गावातील तसेच कर्नाटकातील सर्व मराठे कुलबांधवांनी एकत्र यावे, संघटित होऊन आपली शक्ती वाढवावी. दुर्ग येथे मराठे परिवाराची शाखा काढून ती मुंबईच्या प्रतिष्ठानला जोडावी. त्याचप्रमाणे अखिल भारतीय स्तरावर मराठे कुटुंबीयांनी संघटित होऊन एकमेकांच्या सहकार्याने चांगले उपक्रम राबवावेत, असा ठराव संमत करण्यात आला. संमेलनाच्या शेवटच्या दिवशी मराठे परिवारातील कर्तृत्ववान व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला मराठे परिवारातील २००हून अधिक सदस्य उपस्थित होते. दुर्ग येथील माननीय विष्णुमूर्ती मराठे हे संमेलनाचे अध्यक्ष होते. मराठे प्रतिष्ठान मुंबईचे संस्थापक वामन गणेश मराठे, कार्याध्यक्ष सी.गो. खांबेटे, कार्यवाहक मोहनराव मराठे, प्रभाकर मराठे, मुंबई हे प्रमुख आमंत्रित पाहुणे म्हणून व्यासपीठार होते. म.प्र.चे अध्यक्ष श्री.आनंदराव मराठे आणि अुपाध्यक्ष श्री.रमाकांत विद्वांस यांनी संमेलनाला शुभेच्छा दिल्या. या समयी मराठे प्रतिष्ठानचे कार्य आणि योजनासंबंधी माहिती देण्यात आली. मराठे प्रतिष्ठानचे मुखपत्र 'हितगुज' च्या संपादिका डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे, सौ. निलांबरी मराठे, हेमंत मराठे यांची समयोचित भाषणे झाली. वेदश्री सोमदेव मराठे हिने आपल्या नृत्याविष्काराने सर्वांची मने जिंकण्याबरोबरच अनेक बक्षिसे व प्रेक्षकांची वाहवा मिळविली.

गोविंदराव मराठेयांनी स्वागत केले. प्राचार्य पद्मभूषण मराठे यांनी सूत्रसंचालन केले.

('गोमन्तक' पणजी, साभार शुक्रवार ८ मे २००९ वरून)

# मराठे प्रतिष्ठान चे ९वे अखिल भारतीय सम्मेलन
# दुर्ग, ता. कारकल, जिल्हा - उडुपी
# एक संस्मरणीय अनुभव

दिनांक १,२ व ३ मे रोजी भरलेले हे सम्मेलन अनेक कारणांनी स्मरणात राहील. मराठे कुलवृत्तांतात १५ घराणी असलेला कर्नाटकातील हा भाग मराठे कुलापासून जवळजवळ ६५ वर्षे दूरच राहिला. दुर्गम भाग - घरात शुद्ध चित्पावनी पण बाहेर कानडी - घरातील तरुण पिढी बंगलोरमध्ये मग्न. यातून मार्ग काढणे अवघडच वाटत होते. पण आपल्या प्रतिष्ठानची पुण्याई कामास आली.

मी माझ्या मुलीकडे बंगलोरला नेहमी जातो. वा.ग. च्या सूचनेप्रमाणे मी गजाननराव मराठेंची भेट घेतली व आमचा संपर्क चालू राहिला. मराठे प्रतिष्ठानच्या रत्नागिरी सम्मेलनाला कानडा मधून ५ मंडळी आली होती. गोवा सम्मेलनाला गजाननराव व केशवराव आले होते. गजाननरावांनी माझ्याकडे द. कानडात कारकल भागात मराठे सम्मेलन भरवण्याची इच्छा व्यक्त केली. प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीत ह्यावर चर्चा झाली. सभासदांच्या मनात साशंकता होती. श्री. सी.गो. खांबेटेंना कारकल मराठेंच्या सभांना २दा पाठवून मार्गदर्शन करण्यात आले. सम्मेलनाच्या तारखा सुट्टीतल्या असल्याने अनेकांना इच्छा असूनही रेल्वेचे आरक्षण न मिळाल्याने येता आले नाही.

आम्हाला मुंबई-पुण्याकडच्या १८-२० जणांना जाणे अवघड नव्हे अशक्य झाले. पण मुलुंडचे पर्यटनतज्ञ राजेश रानडे ह्यांनी आम्हाला मुंबई - पुणे - हुबळी - अंकोला मार्गे कारकल-दुर्ग असा ३० तासांचा द्राविडी प्राणायाम करून का होईना पण १ मेला रात्री १२ वाजता दुर्गला सम्मेलन स्थळी पोहोचले. तेथे मध्यरात्रीहि अगत्यपूर्वक स्वागत, गरमागरम जेवण उत्तम निवास व्यवस्था - आम्ही सर्व हाल विसरून निद्राधीन झालो.

सम्मेलनाची व्यवस्था दुर्गच्या प्रसिद्ध हरिहरेश्वर मंदिराच्या प्रांगणात करण्यात आली होती. ३०० च्या वर लोक बसू शकतील असा भव्य हॉल - मंदिराची सर्वांना भोजन नाश्ता - चहापाणी देण्याची व्यवस्था - परिसरात चित्पावनांच्या घरी रहाण्याची सोय - यजमान कुठेच कमी पडले नाहीत. रम्य डोंगरामध्ये वसलेली घरे - घरामागे सुपारी, नारळ, केळी, फणस, काजू, कोको ह्यांची झाडे - डोळ्यांचे पारणे फिटले. यजमान पावसाळ्यानंतर निसर्ग पाहिला या म्हणत



डावीकडून प्रदीप अनंत, डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर, श्री.मोहन सदाशिव, अध्यक्ष श्री.विष्णू मूर्ती, श्री.वा.ग., श्री.कालिदास बाळकृष्ण, श्री.हेमंत व श्री.प्रभाकर

स्थानिक मंडळी स्वागताध्यक्ष विष्णु मूर्ति मराठे ह्यांच्या नेतृत्वाखाली आपुलकीने उत्साहाने काम करत होती. त्यांच्या प्रेमामुळे आम्ही सर्व भारावून गेलो. सर्व कार्यक्रमावर श्री हरिहरेश्वर मंदीर - तेथे चालू असलेला भजन सप्ताह - बटू - भटजींचे बोलणे चालणे आम्हाला नकळत अलगद परशुराम काळात घेऊन गेले.

प्रतिष्ठानच्या कार्याबद्दल सखोल चर्चा झाली. मराठे प्रतिष्ठानशी संबंध पुनर्स्थापित करण्यासाठी दक्षिण-उत्तर कानडामधील चायनीज ड्रॅगन जागा झालेला दिसला. ह्या ड्रॅगनला 'स्वीट टूथ व कोकोनट हार्ट' असल्याने मराठे प्रतिष्ठानचे कार्य तो झपाट्याने प्रगतीपथावर नेईल असा विश्वास मी व्यक्त केला.

करमणुकीच्या कार्यक्रमात धारवाडच्या वैदेही मराठेचे कुचिपुडी नृत्य तसेच यक्षगानाचा कार्यक्रम उल्लेखनीय होता. सम्मेलनापासून स्फूर्ति व उत्साह घेऊन आम्ही परतलो.

**श्री. मोहन सदाशिव मराठे**
**(पृ.३६५)**
खार, मुंबई

# तारेवरची कसरत

**- अच्युत म. चक्रदेव** (पृ.७३२)
अधीक्षक (निवृत्त)

सकाळची ११.३०ची वेळ. अधीक्षकांची न्यायाधीन बंदींच्या विभागांत नित्य तपासणीफेरी चालू होती. सर्व बंदी आपापले वृत्तांत पत्रक (History Ticket) हातांत घेवून रांगेत उभे होते. अधीक्षक एकेका बंदीची विचारपूस करीत त्यांची फेरी मारीत होते. फेरी मारतां, मारतां, ते विन्या लांडेसमोर आले. विन्याची आणि अधीक्षकांची कांही प्रश्नोत्तरे सुरु होती. अचानक विन्याच्या अंगात काय संचारले कोणास ठावूक? विन्या जोरांत पळत सुटला. त्याचे मागे त्या विभागांतील रक्षक, बंदी रक्षक, आम्ही सगळेच त्या दिशेने पळत सुटलो. विन्याला कोणीच थांबवू शकले नाही. परिणामतः विन्या तेथीलच एका उंच झाडावर चढून बसला. सर्वजण आपापल्या परीने त्याला खाली उतरण्याबद्दल विनंती करीत होते. पण विन्या कोणालाच दाद देत नव्हता.

मी अधीक्षकांना भेटलो आणि त्यांना सांगितले की, ''आता आपण जिल्हाधिकारी आणि संबंधीत न्यायमूर्तींना कळवू या, प्रत्यक्ष त्यांना परिस्थिती पहातां येईल. अुद्या विन्या झाडावरून पडला तर मग नंतरच्या चौकशांना पद्धतशीरपणे सामोरे जाता येईल. यावर अधीक्षकांनी ही सूचना मान्य केली. मग त्वरीत मी कार्यालयात येवून संबंधीतांना दूरभाष केले व त्यांना कारागृहात येवून प्रत्यक्ष परिस्थिती पहाण्याविषयी विनंती केली. त्यांचा होकार मिळाला. कांही वेळातच मा. जिल्हाधीकारी व न्यायमूर्तींच्या गाड्या कारागृहाचे परिसरांत आल्या. दोन्ही अधीकाऱ्यांनी न्यायाधीन विभागात येऊन प्रत्यक्ष पहाणी केली. त्यांनीही विन्याला झाडावरून उतरण्याबद्दल विनंती केली पण विन्या त्यांच्याकडे फक्त पहातच राहिला. त्याने काही उत्तर दिले नाही. बाकी कर्मचारी वर्ग मधून मधून विन्याला उतरण्याबद्दल विनंती करत होते. कारागृहातील सुभेदार मोरे यांनी कपडे गोदामातून चाळीस पन्नास गाद्या आणल्या आणि त्या झाडाच्या अवतीभवती पसरून ठेवल्या. समजा चुकून विन्या पडलाच तर त्याला फारसे लागू नये हा त्यांचा हेतू होता.

आता याला कसे उतरवावे हा माझ्या मनात प्रश्न होताच. अचानक मी मुलाखत विभागाच्या वॉर्डर्सना बोलावलं आणि त्यांना सांगितले की ''ज्या बंदींची मुलाखत आलेली असेल त्या बंदीच्या नावाबरोबरच विन्या लांडेचे नाव पण पुकारायला सांगितले आणि त्याप्रमाणे मुलाखतीकरता विन्याचे नाव पुकारले गेले क्षणमात्र विन्याची झालेली हालचाल जाणवली. मी लगेच वॉर्डर्सना सांगितले की विन्याची भेट रद्द करून टाका. विन्या झाडावर चढला आहे तो भेटीला येणार नाही आणि हे विन्याला ऐकू जाईल अशा आवाजात मी सांगितले. ह्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. आणि पाचच मिनीटात विन्या झाडावरून ओरडला साहेब ''माझी भेट रद्द करू नका मी भेटायला येतो.'' यावर मी त्याला सांगितले तू आज शिस्तीचा भंग केला आहेस सबब तुला भेट मिळणार नाही. यावर तो परत जोरात ओरडला मी आलो खाली. आणि हे शब्द माझ्या कानावर पडताहेत तोच विन्या झाडावरून उतरून माझ्या समोर उभा राहिला आणि म्हणाला, 'मला भेट द्या. कोण भेटायला आलं आहे.' तेव्हा मुलाखत वॉर्डर म्हणाला, विन्याचे दोस्त त्याच्या भेटीला येणार आहेत. ते आले की आम्ही विन्याचे नाव पुकारु आम्ही त्याला भेट देऊ.

आता विन्या झाडावरून खाली उतरलेला असल्यामुळे त्याला आम्ही नियमाप्रमाणे वेगळ्या कोठडीत नावाचा पुकारा होईल. म्हणून वाट बघत होता. पाचनंतर मुलाखतवॉर्डरने विन्याचे मित्र निघून गेले ते आता पुढच्या आठवड्यात येतील. असे त्यांनी सांगितले आहे असे सांगितले. यावर विन्याला काही करता येण्याजोगे नव्हतेच त्याचा झाडावर चढण्याचा अध्याय तेथेच संपला आणि सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

कारागृहाची बंदी नेहमीप्रमाणेच वेळेवर झाली. वस्तुतः विन्याला कोणी भेटायला येणार नव्हतेच. त्याला थोडे विचलीत करून त्याचे लक्ष दुसरीकडे वळवावे माझी युक्ती होती.

कारागृहामध्ये असे अनेक प्रसंग मनावर ताण करणारे आणि तुमच्या कर्तृत्वाला आव्हान देणारे असे घडत असतात आणि त्यातून सुटण्यासाठी युक्त्या प्रयुक्त्यांचा अवलंब करून तारेवरची कसरत करायची असते.

✦✦✦

**ती. आई**
**कै. अन्नपूर्णाबाई सदाशिव मराठे**
(पृ.३६५)

**स्मृतिदिन - १७ जून**
**यांच्या स्मरणार्थ**

श्री. मोहन सदाशिव मराठे,
खार(प.) मुंबई.
दूरध्वनी - २६४६४३५१

# इवलेसे रोप लावियले द्वारि (देव क्लासेस)

सात डिसेंबर! आमच्या क्लासचं मोठ्या प्रमाणातील साजरं होणारं गॅदरिंग पाहून मन कसं भरून आलं! वीस वर्ष झाली. चिमणी पाखरं येतात, योग्य मार्ग दर्शना खाली शिक्षण घेऊन पांगली जातात. पण आठवण ठेवून परदेशांतून फोन करतात. घेतल्या शिक्षणाच सार्थक झालंकी अधिक अुत्साह येतो.

पूर्वी अवघे पांचच विद्यार्थी येत होते. हळूहळू माऊथ पब्लीसिटी झाली. मुलांची भावंडे ही येऊ लागली. त्यावेळी सर्व सांभाळून घरच्याघरीच गॅदरिंग होत असे. अगदी रांगोळी घालून, गरम गरम पदार्थ खाऊन विद्यार्थी तृप्त होत असत. जागेची चणचण भासू लागली. विद्यार्थी, पालक सभा वेळोवेळी होऊ लागल्या. परंतू अंगी जिद्द असल्यामुळे, विद्यार्थी मुलांच्या अडचणी सोडविण्यास अुत्तम जाणकरांना बोलविण्यास सुरवात झाली. अनुभवी टिचर्सची एक बॅचच तयार झाली.

बऱ्याच लोकांनी, पालकांनी तुमचे पाठीशी आम्ही आहोत असे तोंड भरून सांगितले. त्यात ''देव मिस'' ला अडचणींनीसामोरे जावे लागले. त्यात त्यांना त्यांच्या सासऱ्यांनी (कै.एम्.एस. देव) खूप मदत केली. आणि आता हा शैक्षणिक वृक्ष आनंदने, डौलाने अुभा आहे. प्रगतिच्या मार्गावर आहे.

''हेव मिस'' म्हणून हाक येते.

''सौ. गौरी शेखर देव'' ही सांगलीतील ''गणेशवाडी'' येथील कै. अनंतराव मराठे यांची आशा मराठे सर्वात धाकटी मुलगी. B.S. (झाली आणी देव घराण्यात आली. कॉलेजला सुट्टी मिळाली की घरी शेतकऱ्यांच्या मुलांना शिकवत असे. अंगात सर्व कला अवगत असल्याने माघार घेणे नाही. सर्वांना मदत करण्याची इच्छा. पुण्यासारख्या शहरात आल्यावर घरातील मर्जी सांभाळून छोटे छोटे कोर्सेस केले. आज तिला त्याचा खूप फायदा होत आहे. आमच्या घरात दर महिन्यास धार्मिक सण असतोच. कधीही क्लास न चुकवता सर्व साध्यकेले जात. गरिब होत्करू, कष्टकरी भगिनींच्या मुलांकडे जातीने लक्ष दिलं जातं. यात तिच्या सहकारी मैत्रीणी चांगली तिला साथ देतात. आमच्या घरी म्हणजे ''साठे-संस्कृती'' मध्ये सुद्धा, चार मैत्रीणी हाताशी धरून दरवर्षी काहीतरी नविन साजरं केलं जातं.

आज मला श्री. शरद महादेव चक्रदेव आमचे आप्पा यांचे कडून ''हितगुजचा'' अंक मिळाला. तेव्हा तुम्ही चार शब्द लिहून का देत नाही? असे बोलणे झाले. तेव्हा हा लिहीण्याचा खटाटोप केला आहे. तेव्हा माझ्या सूनबाईस आपल्या सर्व मराठे मंडळींचे आशिर्वाद हवेत!

आ.कृ.

सर्व विद्यार्थीची मां. आजी व सौ. गौरी शेखर देव यांची सासू - मा. श्रीमती सुधा देव

✦✦✦

*शीतल शिशिरी आम्रतरुवरी*
*फुले शिरशिरी काया मोहरी*
*तरुशिखांवरी नवी गोजिरी*
*सानसाजरी आम्र मंजिरी।।*

*वसंत फुलता नवी नव्हाळी*
*तरुतरुंवरी नवी झळाळी*
*आम्रतरुच्या कायी सजली*
*हिरवी कोवळी राजस बाळी।।*

*चढत्या ग्रीष्मी सोन सकाळी*
*तनू रसरसली आरक्त कपोली*
*पानामागे सलज्ज दडली*
*केशरपिवळी लोभस बाळी।।*

*तरु बावरला व्यथित झाला*
*ताटातुटी जाण मनाला*
*बघताबघता काळ लोपला*
*पाठवणीचा समय ठेपला।।*

*लेकी माझ्या धन परक्याच्या*
*परक्या हाती उद्या जायच्या*
*माहेरवाशिणी चार दिसांच्या*
*वर्षातुनी एकदा यायच्या।।*

*तरु सावरला सतर्क झाला*
*आशेचा मग किरणही दिसला*
*पुरता ऋतू चक्राच्या काला*
*येतील लेकी पुन्हा भेटीला।।*

**- डॉ. सौ. वसुधा आपटे**
(पृ.६२३) **(विद्वांस)**

आम्रतरु हा जमू एक वत्सल पिता आहे व ऋतूकालानुसार त्याच्यात होणाऱ्या बदलांबद्दल आणि कैऱ्यांकडे बघून त्याच्या मनात येणाऱ्या भावनांचे वर्णन करणारी ही कविता.

✦✦✦

# नावीन्याचा ध्यास, संगीताचा कास!

तसा तो हरहुन्नरी कलाकार. अभिनयही त्याने केला आहे, पण गायन, वाचन आणि संगीत यामध्ये जास्त रमणारा. अनेक नामवंत कवी-साहित्यिक आणि कलाकारांची त्याची जवळीक. त्यामुळे त्यांच्या शब्दांचे आणि सुरांचे त्याच्यावर संस्कार होत गेले आणि त्याचीही अभिरूची तितकीच समृद्ध होत गेली. यातूनच त्याला आपल्या जीवनात संगीत क्षेत्रात पुढे जाण्याचा मार्ग तो चोखाळतो आहे. याचीच एक पायरी म्हणजे एकाचवेळी पाच मालिकांच्या शीर्षक गीतांना संगीत देण्याची कामगिरी त्याने केली आहे. हा कलाकार म्हणजे बाळकृष्ण मराठे. एका गोमंतकीयाची ही भरारी नक्कीच अभिमानास्पद अशीच आहे.

बाळकृष्णाचा एक महत्त्वाचा आणि वेगळा गुण म्हणजे त्याला सतत नावीन्याचा ध्यास असतो. त्याला तीच ती गाणी, संगीत गायला आणि त्याची नक्कल करायला आवडत नाही. यामुळेच त्याला वेगवेगळे प्रयोग करण्यास प्रेरणा मिळते आणि त्यातून संगीतातल्या नव्या सृजनाला चालना मिळते, असे त्याला वाटते. यामुळेच बाळकृष्णाने वेगवेगळे उपक्रम राबवले आहेत आणि इतरांच्या वेगवेगळ्या उपक्रमांतून सहभाग घेऊन आपली क्षमताही वाढवली आहे. अगदी, संगीत-काव्य-पेंटिंग असा मिलाफ घडवून आणणाऱ्या शिबिरात सहभाग, रेकॉर्डिंगचे तंत्र आत्मसात करण्यासाठी साऊंड थेरपिस्टचा कोर्स, चित्रपट-मालिका-नाटकाला संगीत देणे, संगीतावरील वेगवेगळ्या कार्यशाळांत सहभाग असे अनेक प्रकार तो त्यामुळेच आनंदाने आपलेसे करू शकला आहे. शास्त्रीय संगीत व सुगम संगीत या दोन्ही प्रांतात तो त्यामुळेच लीलया मुशाफिरी करू शकतो.

बाळकृष्णाचे हे संगीत जीवन खरेतर लहानपणापासूनच पहाटे पहाटे सुरू झाले. धारबांदोडासारख्या ग्रामीण परिसरात वाढलेल्या बाळकृष्णाच्या घरी शेतीवाडी व दूधदुभत्याचा सुकाळ.त्याची आई दूध काढण्यासाठी व इतर कामे करण्यासाठी पहाटे उठत असे व त्याबरोबरच ती रेडिओ लावत असते. त्यावेळी अनेक सुमधुर गाणी अर्धवट झोपेत बाळकृष्णाच्या कानावर पडत. कदाचित याच संस्कारामुळे संगीताकडे आपला ओढा वाढला, असे त्याला वाटते. पुढे मात्र बरीच वर्षे संगीताकडे म्हणजे संगीत शिकण्याशी त्याचा तसा संबंध आला नाही. तो आला वयाच्या २१व्या वर्षी गोवा संगीत महाविद्यालयात दाखल झाल्यानंतर. तसे त्याआधी हायस्कूलमध्ये त्यांच्या शाळेत नाना शिरगावकर संगीत वर्ग घ्यायचे. मात्र तिथे संगीत हाच आपला प्रांत असे कधी त्याला वाटले नाही.

संगीत महाविद्यालयात आल्यानंतर, हीच आपली पुढची दिशा आहे, याची जाणीव त्याला झाली. त्यानंतर पं.कमलाकर नाईक, हनुमंत बुरली, बबनराव हळदणकर यांच्याकडे त्याने संगीताची धडे गिरवले. पुढे किशोरी आमोणकर, अजय पोहनकर यांच्याकडे शिक्षण घेतल्याने सूर अधिक पक्के झाले, तसेच सुरांकडे बघण्याचा एक वेगळा दृष्टिकोन तयार झाला. याशिवाय अच्युत ठाकूर यांच्याकडून त्याने सुगम संगीताचे धडे घेतले आणि नव्या गाण्यांना चाली बांधण्याचाही सराव केला. मुंबई विद्यापीठातील भारतीय शास्त्रीय संगीताची पदवी त्याने मिळवलीच, पण त्याचबरोबर तेथील 'साऊंड रेकॉर्डिंग अ‍ॅण्ड रिप्रॉडक्शन' हा ध्वनिमुद्रणाची तांत्रिक अंगे समजावून देणारा कोर्सही पूर्ण केला. या साऱ्यामुळे त्यांचे संगीताचे ज्ञान अधिकाधिक समृद्ध होत गेले.

मुंबईत संगीताची पदवी मिळवताना बाळकृष्णाची नाट्य व अभिनय क्षेत्रातही धडपड सुरु होती. याच काळात विद्याधर गोखले यांच्यासोबत सात-आठ महिने तो फिरला. त्यांच्या नाटकातून कामेही केली. याचा फायदा पुढे त्यांना नाटकांना संगीत देताना झाला. विष्णू वाघ यांच्या 'तुका अभंग अभंग' आणि 'आदित्यचक्षु' या नाटकांना त्याने पार्श्वसंगीत दिले आहे. यातील 'तुका... 'ला कला अकादमीच्या राज्यस्तरीय 'अ' गट नाट्यस्पर्धेचे प्रथम पारितोषिकही प्राप्त झाले. आहे. याशिवाय मनोज जोशी यांच्या 'कलापी' या गुजराती भाषेतील नाटकालाही त्यांनी संगीत दिले आहे. त्याशिवाय 'द मंकी हू न्यू टू मच' या इंग्रजी चित्रपटाला पार्श्वसंगीत देण्याचीही कामगिरी अगदी सुरवातीच्या काळात बाळकृष्णाने बजावली आहे. हा चित्रपट फ्रान्समध्ये 'हनुमान' या नावाने लोकप्रिय ठरला. साऊंड थेरपिस्टच्या अभ्यासक्रमात केलेल्या अभ्यासाचा यावेळी फायदा झाला. ध्वनिमुद्रण करताना घ्यायची काळजी, माईक, मिक्सर, महौल, आवाज, उच्चार इत्यादी तांत्रिक बाबींचे चांगले ज्ञान असल्यामुळे पुढेही त्याचा फायदा झाला, असे तो सांगतो.

बाळकृष्णने मागील काळात अनेक कार्यक्रम करण्याबरोबरच नवे अल्बम आणि मालिकांना संगीत देण्याचेही काम केले आहे. भक्तिसुधा, साई देवदूत, पारवडेश्वर महाराज या त्याच्या भक्तीगीतांच्या कॅसेट लोकप्रिय ठरल्या आहेत. त्याचबरोबर गोव्यातील मागील निवडणुकांवेळी भाजप आणि काँग्रेस या दोन्ही

पक्षांच्या प्रमोशनल गाण्यांच्या कॅसेट बनवणारा हा वेगळा व अवलिया संगीतकार ठरावा. अलीकडच्या साम टीव्हीच्या पाच मालिकांना त्याने संगीत दिले आहे.

त्याआधी 'आकाश पेलताना' आणि 'गुण्यागोविंदाने' या मालिकांना त्याने संगीत दिले आहे. नवनिर्मितीचा हा ध्यास जपण्याबरोबर शास्त्रीय संगीताची कासही त्याने सोडलेली नाही. त्याचा नियमित रियाझ हा चालूच असतो. त्याचबरोबर अनेक संगीत महोत्सवातून त्याने आपली मैफली रंगवली आहे. फार्मागुढी, कला अकादमी येथे होणाऱ्या संमेलनात त्याने सहभाग घेतला आहे. गोव्यातील प्रतिष्ठेच्या केसरबाई केरकर संगीत संमेलनातही आपली रागदारी पेश करण्याची संधी त्याने मिळवलीय. त्याचबरोबर पुणे, मुंबई व त्र्यंबकेश्वर येथील संगीत कार्यक्रमातही त्याने आपली कला सादर केली आहे. कीर्तन महोत्सवातही 'वृत्त आणि छंद' असा वेगळा कार्यक्रमही त्याने सादर केला आहे.

बाळकृष्णाने अनेक दिग्गजांकडून संगीताचे धडे गिरवले. आजही आपण शिकतो आहे, अगदी अलीकडे मागील महिन्यात हृदयनाथ मंगेशकरांच्या कार्यशाळेतही आपण त्यांच्याकडून मार्गदर्शन घेतले आहे. मात्र हे करताना आपण कधीही कुणाची नक्कल करण्याच्या मागे गेलो नाही. आपल्या आवाजावर कुणाचे संस्कार होऊ दिले नाही. त्यामुळे आपली वेगळी ओळख टिकवता आली आहे, असे तो सांगतो. त्यासाठी आपण रियाझाला महत्त्व देतो व कार्यक्रमही अगदी कमी करतो. त्याऐवजी वाचनाला जास्त वेळ देतो. याशिवाय वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यक्तींशी असलेली मैत्री हे आपले बलस्थान आहे. यामध्ये विष्णू वाघ, किशोर कदम, मनोज जोशी, इब्राहिम अफगाण, चंद्रशेखर सानेकर यांच्याशी होणाऱ्या संवादातून आपलीही सृजनशीलता समृद्ध होत असते. त्यामुळेच मीही कविता लिहितो व त्याला संगीतही देऊ शकतो, असे बाळकृष्ण सांगतो.

सध्या तरी आपण संगीत हाच व्यवसाय म्हणून निवडला आहे. त्यामुळे त्याचदृष्टीने आपले सारे प्रयत्न सुरु आहेत. सध्या आपण विष्णू वाघ यांच्या कवितांवरील 'झिंझीर झिंझीर सांज' हा अल्बम तयार करीत आहे. याशिवाय इब्राहिम अफगाण यांच्या 'अदेव्हज्' या माहितीपटाला संगीत देत आहे. यामध्ये पाच गाणी आहेत. त्यात आणखी गाण्यांची भर घालून अल्बम करण्याचाही विचार आहे. वास्तविक याचसंदर्भात अफगाण यांच्याशी चर्चा करण्यासाठी साम टीव्हीच्या ऑफिसमध्ये गेलो होतो आणि तिथे मला साम टीव्हीचा पाच मालिकांना संगीत देण्याची जबाबदारी मिळाली. यापुढे एक चांगला सिनेमा करावा अशीही आपली इच्छा असल्याचे बाळकृष्ण यांनी सांगितले. एका गोमंतकीय कलाकाराची ही धडपड आणि त्यातून मिळवलेले यश हे कौतुकास्पद आणि गोवेकरांसाठी अभिमानास्पद असेच आहे.

**प्रेषक - श्री.कालिदास मराठे (पृ.५४१)**

'गोमन्तक' पणजी - दि.८ मे २००९ वरून साभार

✦✦✦

---

दुबळ्यांच्या शांती-अहिंसेने देशाचा घात होतो. देश टिकवायचा, तर शक्ती हवी, शस्त्रे हवीत. रामाच्या हातात धनुष्य आहे आणि श्रीकृष्णाच्या हातात सुदर्शन चक्र. सज्जनांच्या रक्षणासाठी प्रत्यक्ष (श्रीकृष्णाच्या) देवांनाही हाती शस्त्रे घ्यावी लागतात. राष्ट्राच्या सीमा फक्त तलवारीनेच आखता येतात, तेव्हा राष्ट्र रक्षणार्थ शस्त्रसज्ज व्हा.

**- स्वातंत्र्यवीर सावरकर**

---

### सुगरणीचा सल्ला

१.पुलावाचा कांदा तळताना अर्धा टी स्पून साखर घालून परतावा, कुरकुरीत होतो.

२.रोज येणारी दूधाची पिशवी दूध काढल्यावर अुलटी करावी व पिशवीत हात घालून चेहऱ्याला चोळावी. मसाज होतो चेहेऱ्याची कांती मऊ, तजेलदार होते. चेहऱ्याला काळे डाग असल्यास जातात.

---

### सुविचार

⊙ आपल्या भावना जमिनीसारख्या खालच्या पातळीवर ठेवल्यात तर कुणीही त्यांना पायाखाली चिरडणारच! त्या आकाशा इतक्या उंच ठेवा..... प्रत्येकाला त्यांना स्पर्श करण्याची इच्छा होईल.

⊙ अेखादा प्रश्न तुम्ही सोडवू शकत असाल, तर चिंता करण्याची गरज काय? सोडवू शकत नसाल, तर चिंता करून अुपयोग काय?

⊙ गृहिणी तेजस्विनी असेल तर गृहस्थाचा पुरुषार्थ पराक्रमी होतो.

⊙ भक्ती हे सोंग नाही, मन सुधारण्याचा तो अेक मार्ग आहे.

# प्रतिष्ठान वृत्त

**कार्यकारी मंडळ**

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवरून संपर्क करून यावे म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

शनिवार दि. १४ मार्चला लक्ष्मी केशव कार्यालय, ठाणे येथे दु. ४ वाजता प्रतिष्ठानची बैठक घेण्याचे ठरविले होते. परंतु सभागृहात कार्यकारिणीचे सदस्य अुपस्थित राहाण्यास अुशीर झाला आणि नियोजित कार्यक्रम ५ वाजता वेळेवर सुरु व्हावा म्हणून बैठक घेतली. पण ती थोडक्यात आटोपली.

शुक्रवार दि. १० अेप्रिल २००९ला कार्यवाह श्री. हेमंत अरुण यांच्या घरी मराठे दु. ४ वाजता प्रतिष्ठानची बैठक भरली. अध्यक्ष आनंदराव, अुपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस (सौ. शुभाताई विद्वांस, श्री. वा.ग. मराठे, सौ. वृषाली मराठे, विश्वस्त श्रीमती सुलभाताई मराठे, श्री. प्रभाकर दामोदर, डॉ.सौ. सुमेधा प्रभाकर, श्री. लक्ष्मणराव शंकर, सी.गो. खांबेटे, डोंबिवलीचे सुरेश मराठे, श्री. निरंजन मराठे, सौ. वर्षा शरद मराठे इत्यादी मंडळी बैठकीला अुपस्थित होती. हेमंत मराठे यांनी अहवाल वाचन केले. पत्रव्यवहारावर चर्चा झाली. त्याचप्रमाणे सी.गो. खांबेटे यांनी दुर्ग येथे होणाऱ्या ९वे अखिल भारतीय मराठे संमेलन, याविषयी सविस्तर माहिती सांगितली. संमेलनामधे मुंबई मराठे प्रतिष्ठानचा कशा प्रकारचा सहभाग असेल याविषयी साधकबाधक चर्चा झाली. काही महत्वाचे निर्णय अध्यक्षांच्या अनुमतीने घेण्यात आले. कोकमसरबत, अल्पोपहार, चहापान होऊन बैठक संपली.

**मराठे प्रतिष्ठानचे संस्थापक कै. श्री. सुरेशभाऊ मराठे यांचा स्मृतीदिन**

शनिवार दि. १४ मार्च २००९ ला सायंकाळी ५.३० वाजता लक्ष्मीकेशव कार्यालय, ठाणे येथे मराठे प्रतिष्ठानचे संस्थापक कै.श्री. सुरेशभाऊ मराठे (पृ.३९९) यांचा स्मृतीदिन कार्यक्रम सादर झाला.

सह्याद्रिवाहिनीचा 'हिरकणी' पुरस्कार मिळालेल्या न्यायवैद्यकशास्त्रनिपुण, शवविच्छेदन आणि रावाचीकित्सा क्षेत्रात आपल्या वैद्यकीय कामगिरीचा ठसा अुमटविणाऱ्या डॉ. वसुधा आपटे, (पृ.६२३) (माहेरवाशीण विद्वांस) यांची विशेष मुलाखत 'हितगुज'च्या संपादिका डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर (पृ.१२०) यांनी घेतली. डॉ.सौ. सुमेधा प्रभाकर यांनी विचारलेल्या प्रश्नांना डॉ.सौ. वसुधाताईंनी मनमोकळेपणाने अुत्तरे दिली. श्रोत्यांच्या शंकांचे ही निरसन केले. मुलाखत चांगली रंगली. वसुधाताईंच्या असाधारण कर्तृत्वामुळे समस्त मराठे मंडळी भारावून गेली आणि आपल्या कुळात अशी माहेरवाशिण आहे म्हणून अभिमानाने मान ताठ झाली.

मृत्यूची खूप जवळून ओळख झाल्यामुळे जीवनाची महती कळली, मृत्यूबद्दल अेक प्रकारचं चिंतन करायला मिळालं, मृत्यू कधीही, कुठेही कसाही आणि कुणावरही झडप घालू शकतो याची जाणीव झाली. त्यामुळे 'क्वालिटी ऑफ लाईफ' ला महत्व दिलं. जीवन रसपूर्ण, आनंददायी जगावे जीवन ही अेक आनंदयात्रा व्हावी आणि आपल्या आनंदात इतरांना सहभागी करून घेता यावे, हा त्यांनी सांगितलेला मंत्र चिरकाल स्मरणात राहील असा आहे.

त्यानंतर व्यंगचित्रकार श्री. विकास सबनीस यांची मुलाखत श्री. भाऊ मराठे यांनी घेतली. विकास सबनीसांनी व्यंगचित्र काढताना सगळ्यात वाईट, कुरुप व्यंगचित्र काढायला कठीण असे कोणते तर माधुरी दीक्षित हीचचे असे सांगून आश्चर्याचा धक्काच दिला. त्यांनी सोनिया गांधी, शरद पवार, लालूप्रसाद यादव यांची व्यंगचित्रे रेखाटली. 'व्हाया वस्त्रहरण' चे लेखक श्री. गंगाराम गवाणकर यांनी श्रोत्यांना खळखळून हसविले. दोन्ही कार्यक्रम रंगतदार झाले.

स्वादिष्ट अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली. (या स्मृतिदिनाला कै.सुरेशभाऊंच्या पत्नी - श्रीमती सुलभाताई मराठे, त्यांचे सुपुत्र नाशिकचे श्री.वसंत व मुंबईचे श्री.यशवंत मराठे, सौ.अदिती यशवंत हे आवर्जून अुपस्थित होते.)

## रेसिपी

*पत्नी म्हणाली पतीला नवी रेसिपी केली*
*खाऊन तर बघा आणि सांगा कशी काय जमली।*
*ती डिश कसली होती त्याला कांही कळेना*
*अेकही घास गळ्याखाली उतरेना।*
*तुम्हाला मेलं कौतुकच नाही खाताय तोंड वाकडं करत*
*प्रशांत भाऊजींनी खाल्ली असती मिटक्या मारत मारत।*
*प्रशांत मिटक्या मारतो कारण त्याला उपाय नसतो*
*'तसले' खाण्याबद्दल त्याला पैसा मिळणार असतो।*
*माझे काहीं तसे नाही, मलाच ते सोसावे लागेल*
*पोट बिघडून चार दिवस घरीच बसावे लागेल।*

**लेखक : श्री.वि.म. मराठे** (पृ.२३५)
पद्मश्री, विश्रामबाग,
सांगली - ४१६४१५
फोन - ०२३३-२३००७२

# वाचकांचा पत्रव्यवहार

मा. महोदया,

सादर नमस्कार,

'हितगुज' चा मार्च २००९चा अंक नेहमीप्रमाणे मिळाला. माझे वडील कै. वसंतराव मराठे (घराणे ६५वे) यांचेविषयी पृष्ठ २० वर आलेले निधनाचे वृत्त वाचले. त्यात आपण कै. वसंतरावांना 'मराठे प्रतिष्ठान'द्वारा उल्लेखिलेल्या श्रद्धांजली बाबत मी आम्हा मराठे कुटुंबियांतर्फे आपले आभार मानतो.

योगायोग म्हणजे त्याच अंकात पृष्ठ ४ वर अखिल चित्पावन. ब्रा. विद्यार्थी सहाय्यक मंडळ, रत्नागिरी यांच्या अमृतमहोत्सवी वर्षा विषयी आणि त्याबद्दलच्या देणग्यांच्या आवाहनाचाही मजकूर आला आहे. त्या संस्थेचे संस्थापक कै. बाळाजी हरी तथा बळवंतराव मराठे हे माझे चुलत आजोबा - माझ्या वडिलांचे कै. वसंतरावांचे सख्खे चुलते होते.

एकाच घराण्यातील (६५वे) दोन व्यक्तींशी संबंधित मजकूर 'हितगुज' च्या एकाच अंकात यावा, याला मी 'योगायोग' म्हटले.

गेल्या ऑक्टोबर २००८ मध्येच कै. वसंतरावांनी अखिल चित्पावन ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळास संगणक घेण्यासाठी व शिष्यवृत्त्यांसाठी एकूण रु. ५१,०००/- ची देणगी दिली होती.

'मराठे' प्रतिष्ठानच्या कार्याविषयीही माझ्या वडिलांना आपुलकी होती. बोरीवली येथील न्या. दिलीपजी मराठे यांचे घरी झालेल्या मेळाव्यासही वसंतराव उपस्थित होते. माझे काका - माधवराव मराठे (भाजप आमदार - ९५ ते २०००) यांच्या मराठे प्रतिष्ठानने केलेल्या सत्कारासही ते माधवरावांबरोबर पुण्यास गेले होते.

आयुष्यभर नि:स्वार्थीपणे संघाचे व पर्यायाने सामाजिक तसेच शैक्षणिक संस्थेचे कार्य त्यांनी केले. त्यांच्या अंत्यदर्शनास मराठे परिवाराचे न्या. श्री. दिलीपजी मराठे आले होते हे मी आपणासही सांगी इच्छितो.

कै. वसंतरावांस दिलेल्या श्रद्धांजलीबद्दल पुनश्च आभार.

कळावे,

**श्रीकांत मराठे**
वनश्री, प्लॉट नं.१३८,
अभिनव नगर, रोड नं.६,
बोरिवली (पूर्व), मुंबई-४०००६६.
दूरध्वनी - २८९७१९६८.

◆◆◆

डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे यांसी,

सविनय नमस्कार,

मागच्या मुंबई भेटीत पूर्व संपादक श्री. लक्ष्मण शंकर मार्फत आपली भेट घेण्याचे घाटत होते. पण शक्य झाले नाही. क्षमस्व.

कार्ड लिहिण्याचा प्रपंच एवढाच की मला मार्च २००९ चा अंक ''हितगुज'' चा आजपावेतो मिळालेला नाही. कारणे कांहीही असोत. शक्य असल्यास एक प्रत माझ्या मागे लिहिलेपल्या पत्त्यावर पाठवून उपकृत करावे ही विनंती. आपणास कार्ड पाठविणे अप्रस्तुत वाटल्यास क्षमस्व. शुद्ध हेतू आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या या अंकात उडपी (दुर्ग) कर्नाटक येथे होणाऱ्या ९व्या मराठे संमेलनाबाबतच्या तारखा व वारांचा कांहीसा घोळ झाला आहे. पहा - पृष्ठ क्र.३ वर - शुक्र/शनि. व रविवार- १.२.३ मे तारखा, पृष्ठ क्र. १४ वर - वार नाहीत. - ३० एप्रिल, १ मे व २ मे हे तीन दिवस.

आपणास देत असलेल्या तसदी बद्दल क्षमस्व. लहान तोंडी मोठा घास घेत नाही ना? असल्यास पुन: क्षमायाचना याबाबत योग्य तो खुलासा व्हावा. ही विनंती.

मराठे प्रतिष्ठान ही सार्वजनिक विश्वस्त म्हणून नोंदणी क्र. ७९१८ (मुं.) दि. १२.१.१९८१ रजिस्टर्ड आहे. या मंडळाची घटना नियमावली (उपनियमासह)ची एक प्रत मला माझ्या खाजगी कामासाठी हवी आहे. त्यासाठी काय करावे लागेल ही माहिती किंवा एक प्रत मिळवून माझ्या पत्त्यावर पाठविण्याची मेहेरबानी करावी. अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे - ठाणे यांचेकडे प्रत्यक्ष भेटीत या विषयावर अवश्य बोलेनच.

**कृष्णा का. मराठे**
१३६९, गृहनिर्माण वसाहत,
हरवळे, पो. प्रतापनगर, सांखळी,
गोवा - ४०३५०५

आपले कुलबांधव किती बारकाईने आणि डोळसपणे 'हितगुज' वाचतात आणि चूक लक्षात आणून देतात त्याबद्दल त्यांना धन्यवाद. पुन्हा शुद्ध हेतू आणि क्षमाभावना श्रीकृष्ण मराठे यांच्या अुदार मनाची साक्ष देते.

**- संपादिका**

◆◆◆

संपादिका हितगुज

स.न.

अंकात अहवाल हिशेब इ. रुक्ष पाने असूनही निवडलेले सर्व लेखन दर्जेदार असल्याने अंक रोड असला तरी सुंदर वाटला. आपले संपादन चांगले आहे. माझे प्रदीर्घ पत्र आपण कात्री न लावता घेतलेंत त्यात अर्थ साधनाचे अर्ध झाले. अर्थाची विशेष हानी नाही!

संघटनेत मुखपत्र हे कुंकवासारखे आहे. ते सुंदर आदर वाढवणारे व जपावे असे असावे पुष्कळदा नवतेच्या नावाने हे कुंकु टिकली म्हणूनही टिकत नाही.तो धर्म असावा. धन्यवाद पत्र पुरे करतो.

- आपला चहाता वाचक

**ज.गो. मराठे**

◆◆◆

मा. संपादिका,

मार्च २००९चा अंक मिळाला. ९व्या संम्मेलनाला उपस्थित राहू शकत नाही. नागपूरला मौंजी निमित्त जात आहे. कार्यक्रमाची तारीख अजून अगोदर जाहीर व्हायला हवी होती असो. (बिंबल येथे हजर होतो.) संमेलनासाठी शुभेच्छा म्हणून ५०१ रु. चा धनादेश पाठवण्याचा मानस आहे. क्रॉस चेक कोणत्या नावाने द्यावा ते कळवावे. (०२५१-२६००२६२: मोबाईल-९४२०८७६६१७) जवळजवळ वर्षभराचे अेक श्री. खांबेटे अंबरनाथला आले तेंव्हा मिळाले. मला तर हितगुज बंद झाले असे वाटले. सुदैवाने तसे नाही! चित्पावन संमेलनात तसेच अ.भा. बहुभाषिक ब्राह्मण संमेलनात प्रतिष्ठानचे अस्तित्व जाणवले नाही. म्हणून खेद वाटतो. सविस्तर चर्चा श्री. खांबेटे यांचेशी झाली आहे. बाह्यरंग सुधारले अंतरंगाचे काय?

**मनोहर दामोदर**, प्लॉट नं.२१८९,
स्मृतिधाम कानसई से. अंबरनाथ
दूरध्वनी - ९४०८७६६१७.

◆◆◆

मा. संपादक,
मा. महोदया,

हितगुजच्या मार्च २००९च्या अंकात छापून आलेल्या श्री. विनायक केशव मराठे यांनी लिहिलेल्या 'मि.श्रीकांत साने' या कथे विषयीचे हे माझे खुषीपत्र. त्याविषयी मी लेखकाशी दूरध्वनिवरून समाधान व्यक्त केले आहेच.

कथाविषय अतिशय भावपूर्णरीत्या लिहिला आहे. कथेतील भाषा उत्तम आहे. कथावाचताना एक दोनदा डोळ्यात अश्रू उभे राहिले. शेवटचे वाक्य तर गोष्टीचा कळस आहे. आपल्या संपादनाविषयी कौतुक आणि आभार. धन्यवाद!

**श्रीराम व्यं. मराठे** (पृ.६३)

◆◆◆

माननीय संपादिका 'हितगुज'
स.न.वि.वि.

हितगुजचा प्रत्येक अंक वाचनीय असतो. हल्ली प्रत्येक सामाजिक कार्यात, सामाजिक संस्था, ब्राह्मण मंडळे इ. मध्ये तरुणांचा अभाव प्रामुख्याने जाणवतो. या अुदासीनतेचे कारण काय? या विषयावर एखाद्या अंकात विचारमंथन व्हावे.

**किरण मराठे**
सैनिक सोसायटी देवळाली
कॅम्प,४२२४०१.
दूरध्वनी- २४५१-२६४-२९७डी-
के०३६.

◆◆◆

सप्रेम नमस्कार,

हितगुज अंक नियिमत मिळतो. व तो मी आवर्जुन वाचतो.

पूर्वी सुरेशभाऊ असतांना मी त्यांना अनेकदा मुंबईत भेटलो. त्यांचा अहवास लाभला. मराठे प्रतिष्ठानच्या सुरुवातीच्या बैठकींना येत असे. त्यावेळी बराच काळ मुंबईत येत असे. आता पुण्यात स्थायिक झालो आहे.

हितगुजचे अंक वाचनीय होत आहेत. त्याचे रुप व स्वरुप, अंतरंग चांगले होत आहे. याचे कारण साहित्यिक गुणवत्ता तुम्हाला लाभली आहे.

हितगुजचा साहित्य दर्जा उंचावत जावा ही शुभेच्छा.

सुरेशभाऊंचे स्मरण दिन ४ला झाले. त्यांच्यासारखे संस्थापक आपल्याला लाभले हे आपले भाग्यच.

**रं.गा. मराठे**, ३/३४ लोकमान्य नगर,
लालबहादुर शास्त्री रोड,
नवी पेठ, पुणे ४११०३०.
दूरध्वनी -
(०२०)२४३३१६७१,९८६०७०३९७७.

◆◆◆

डॉ. सौ. सुमेधा मराठे, सा.न.वि.वि.

हितगुज अंक मिळाला खूपच छान नियोजन संपादन आहे.

कोल्हापूर येथे मराठे प्रतिष्ठान संमेलन भरविणेचे असल्यास आमची संपूर्ण तयारी आहे. सुरेशभाऊंची आठवण सदैव येत असते.

डॉ. वसुधा आपटे यांचे अभिनंदन.

श्रीमती प्रतिभा मराठे यांचे अभिनंदन.

**नंदकुमार मराठे**
महालक्ष्मी मंदिर,
कोल्हापूर-४१९०१२.
दूरध्वनी-०२३१ २५४१८२३.

◆◆◆

संपादिका हितगुज -

कै. सुरेशभाऊ मराठे यांच्या स्मृतीदिना प्रीत्यर्थ श्रद्धांजली वाहातो. तसेच दुर्ग येथे हाणाऱ्या अखिल भारतीय मराठे संमेलनाला शुभेच्छा. 'हितगुज' ला मनापासून शुभेच्छा.

**श्रीपाद माधव मराठे** (पृष्ठ ४६)
७१०, जी नरहर वसाहत,
शिवाजीनगर,
रत्नागिरी-४१५६३९
दूरध्वनी - २२४०४३.
मोबाईल-९४०३५०९८१६.

✦✦✦

## नांदा सौख्यभरे

चि. हिमांशु यशवंत मराठे, (दिल्ली) यांचा शुभविवाह बुधवार दि. १५ अेप्रिल २००९ला, मोतीमहाल, राणाप्रताप मार्ग, लखनौ येथे चि.सौ.कां. मुदिता विरेंद्र शर्मा हिच्याबरोबर थाटामाटत झाला. विवाहाचा स्वागतसमारंभ रविवार दि. १९ अेप्रिल २००९ला दिल्ली येथील रिव्हर साईड क्लब मधे झाला.

मराठे प्रतिष्ठान द्वारा नवविवाहितांना हार्दिक शुभेच्छा.

# मराठे प्रतिष्ठान,
# ९वे अखिल भारतीय मराठे संमेलन



**कु.वेदश्री सोमदेव मराठे (धारवाड) हिचे आकर्षक नृत्य**

मराठे प्रतिष्ठान, ९वे अखिल भारतीय मराठे संमेलन दि. १ मे, २ मे आणि ३ मे असे तीन दिवस दुर्गग्रामी (ता. कार्कळ, जिल्हा. अुडिपी) कर्नाटक राज्य) थाटामाटात साजरे झाले. मराठे परिवारातील सुमारे दोनशे सदस्य संमेलनात सहभागी झाले होते.

दुर्गा गावातील माननीय श्री. विष्णूमूर्ती मराठे यांनी संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले. सर्वश्री. गोविंदराव मराठे, गजाननराव, केशवराव, पद्मनाभराव, अनंतराव, कोषाध्यक्ष श्री. सतिशराव मराठे हे कार्यकारिणीचे संमेलन समितीचे सदस्य होते. आणि मराठे प्रतिष्ठान, मुंबईचे संस्थापक श्री. वामन गणेश मराठे तसेच कार्याध्यक्ष श्री. सी.गो. खांबेटे, कार्यवाह श्री. मोहनराव मराठे, कोषाध्यक्ष श्री. प्रभाकर मराठे हे मुंबई कार्यकारिणीचे सदस्य होते. या सर्वांच्या सहकार्यामुळे संमेलन यशस्वी पार पडले.

प्राचार्य पद्मभूषण मराठे यांनी अुत्तम आणि नेटके सूत्रसंचालन केले. संस्कृत भाषेवरचे त्यांचे प्रभुत्व सर्वांना भावले. श्री. गोविंदराव मराठे यांनी सर्वांचे, स्वागत समितीचे अध्यक्ष या नात्याने मनापासून स्वागत केले. सामूहिक अर्थवशीर्ष पठण, वेदमंत्रातील प्रार्थना, कुळदेवतेला नमस्कार, भगवान परशुरामांचे स्मरण केले गेले. या संमेलनात मराठे प्रतिष्ठान कार्य आणि भावी योजनांच्या संबंधी माहिती व चर्चा यावर श्री. सी.गो. खांबेटे, श्री. मोहनराव मराठे, श्री. वा.ग. मराठे, सौ. नीलांबरी मराठे, श्री. हेमंत मराठे तसेच मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र 'हितगुज' च्या संपादिका डॉ.सौ. सुमेधा प्रभाकर मराठे यांनी आपले विचार प्रकट केले. हरिहरेश्वर मंदिर दुर्गग्रामातील येथे भजन सप्ताह चालू आहे. त्याला भेट देऊन सर्व कुलबांधवांनी दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. त्याचप्रमाणे मराठे मिल्क प्रॉडक्ट कुटिरोद्योग केंद्र व अन्य ऋषीकेंद्रांना, ग्रॅनाइटच्या कारखान्यांना भेटी दिल्या आणि त्यासंबंधी ज्ञानात भर पडली. तसेच कानडी 'मराठे' मंडळींची दिनचर्या, नित्य व प्रासंगिक परंपरा, 'मराठे' मंडळींचे सांस्कृतिक कार्य याविषयी संमेलनात बरेच कार्यक्रम झाले. सी.डी. द्वारा बोडण विधीची माहिती अुत्कृष्ट दिली गेली. संमेलनाचा भाग म्हणून पुरातन गृहोपयोगी वस्तूंचे प्रदर्शन होते.

## आकर्षक नृत्य

संमेलनात झालेला आकर्षणाचा अुत्तम कार्यक्रम म्हणजे धारवाड येथे राहणारी इ. सहावीतील विद्यार्थीनी कु.वेदश्री सोमदेव मराठे हिच्या नृत्याचा. वेदश्रीच्या दिलखेचक नृत्याने संमेलनातील सगळेजण अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. भरतनाट्यम, कुचिपुडी नृत्याचा तिचा अविष्कार लाजबाब! वेदश्रीच्या नृत्याच्या अदाकारी सर्वांच्या कायम स्मरणात राहातील. ज्याच्या त्याच्या तोंडी तिचेच कौतुक अैकू येत होते. तिला उत्स्फुर्तपणे टाळ्यांबरोबर बक्षिसेही (पैशाच्या रुपात) मिळाले. अेवढ्या लहान वयात तिने नृत्यकला चांगलीच आत्मसात केलेली दिसली.

योगाशिक्षक श्री. विघ्नेश अनंत मराठे यांनी ही योगावर चांगले माहितीपूर्ण व्याख्यान दिले. त्यांचा शिष्य संजयकुमार याने योगाची प्रात्यक्षिके दाखवून अुपस्थितांच्या टाळ्या मिळविल्या. स्वस्तिकासनाने सुरुवात करून चैतन्यासन, शवासन ही दाखविले.

श्री. सत्यनारायण मराठे, सौ. निधी करुणाकर मराठे बंगलोर यांची भाषणे चांगली झाली. या संमेलनाला दुर्ग कर्नाटक मराठे परिवाराचे आदरस्थान असलेले गुरुवर्य पूज्य वामन महाराज यांनी आशीर्वाद दिले.

श्रीहरिहरेश्वर देवस्थानाचे प्रमुख श्री. विठ्ठल अनंत पाठक आणि अखिल कर्नाटक चित्पावन संघाचे अध्यक्ष श्री. भालचंद्र रामचंद्र डोंगरे हे प्रमुख पाहुणे अुपस्थित होते. स्वागत समितीचे अध्यक्ष श्री. गोविंद पुरुषोत्तम मराठे यांनी प्रास्ताविक केले. श्री. रत्नाकर मराठे यांनी निवेदन केले. श्री. गणेश मराठे यांनी आभार मानले. माळा येथील श्री. गजानन मराठे यांच्या अुपस्थितीत विविध सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. विशेष म्हणजे यक्षगान कार्यक्रमात भगवान परशुरामांचे आख्यान सहस्त्रबाहू कार्तवीर्यराजाची कथा चांगलीच रंगली. हा जोरदार कार्यक्रम झाला.

## संमेलनाची फलश्रुती

दुर्ग गावातील, कर्नाटकातील मराठे कुलबांधव, गोवा, पुणे, मुंबई येथील कुलबांधवांनी सर्वांनी अेकत्र यावे, संघटीत होऊन शक्ती वाढवावी. तसेच दुर्ग या गावी कर्नाटकातील मराठे कुलबांधवांची शाखा काढावी आणि मराठे प्रतिष्ठान, मुंबईला ती जोडावी. परस्परांच्या सहकार्याने चांगले अुपक्रम राबवावेत तसेच दुर्गग्रामी कर्नाटकातील मराठे कुलबांधवांनी १ ते ३ मे हा संमेलनाला वर्धापन दिन साजरा करावा. त्यायोगे मराठे परिवार पुन्हा एकत्र येईल. कुळासाठी, समाजासाठी, देशासाठी, विधायक कामे केली जातील. दि.३ मे ला, 'कर्तृत्ववान मराठे' सत्कार समारंभ झाला. समारोप व आभार प्रदर्शन होऊन संमेलनांची सांगता कधी झाली ते कळलेच नाहीत. सर्वांनाच तीन दिवस निसर्गाच्या सहवासात, मराठे परिवारात रमायला आवडले. अशा या 'अव्वल' झालेल्या मराठे परिवार संमेलनाची सांगता प्राचार्य पद्मभूषण मराठे यांनी संस्कृत मंत्राने केली.

असे हे ९वे अखिल भारतीय मराठे प्रतिष्ठान संमेलन स्नेहवर्धन व कुळवर्धन, घराणे वाढविणारे ठरले.

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे**

(पृ.१२०)

हितगुज - संपादिका

✦✦✦

# मराठे प्रतिष्ठान वृत्त

शुक्रवार दि. २२ मार्च २००९ ला मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीची बैठक दुपारी ४ वाजता जोगेश्वरी येथे श्री.वा.ग. मराठे यांच्या निवासस्थानी भरली. अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे, अुपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस त्याचप्रमाणे सर्वश्री सी.गो. खांबेटे, मोहनराव मराठे, प्रभाकरराव मराठे, हेमंत मराठे, स्वत: वा.ग. त्यांच्या पत्नी सौ. वृषाली, डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर ही मंडळी अुपस्थित होती.

पत्रव्यवहाराचे वाचन झाले. मराठे प्रतिष्ठानची घटना - नियमावली यात काही बदल करणे आवश्यक आहे. याबाबत चर्चा झाली. कर्नाटकातील दुर्ग येथे मराठे प्रतिष्ठानचे ९वे संमेलन कसे यशस्वीपणे संपन्न झाले. याविषयी सविस्तर सांगण्यात आले. 'हितगुज' त्रैमासिकाचा छपाईखर्च व टपालखर्च भरून काढण्यासाठी 'हितगुज'ची आजीवन वर्गणी सर्व सभासदांसाठी रु. ११०० करणे आवश्यक आहे. (सर्व सभासदांमध्ये माहेरवाशीणींचाही समावेश आहे.) 'हितगुज' निधी देणगी मधे जास्तीत जास्त पैसे जमले तर 'हितगुज'चे स्वरुप चांगले राहील. पृष्ठसंख्या ही वाढविता येईल. जाहिराती ही 'हितगुज' मधे येणे गरजेचे आहे. याविषयी गंभीरपणे निर्णय घेण्यात आला. आपले कुलबांधव सदस्य निश्चितच 'हितगुज'ला आर्थिक साह्य करतील आणि आजीवन वर्गणी ११०० रु. लवकरात लवकर पाठवतील असा विश्वास या बैठकीत व्यक्त केला गेला. त्याचप्रमाणे भरपूर जाहिरातीही मिळतील.

दुर्ग येथल्या ९व्या मराठे प्रतिष्ठान संमेलनासाठी आर्थिक सहाय्य निधी म्हणून रु.दहाहजार देणगी मुंबईच्या मराठे प्रतिष्ठानने देण्याचे ठरवले.

सौ. वृषालीवहिनींनी केलेली चविष्ट आंबेडाळ, अल्पोपहाराने सभा संपली.

**मानसन्मान**

श्री. कालिदास बाळकृष्ण मराठे

यांच्या 'शालेय पातळीवर गुणवत्तेचे मानांकन आणि श्रेणीकरण'

या पुस्तकाची दुसरी आवृत्ती प्रकाशित

गोवा येथील श्री. कालिदास मराठे (पृ.५४१) यांच्या 'शालेय पातळीवर गुणवत्तेचे मानांकन आणि श्रेणीकरण' या चौथ्या पुस्तकाची दुसरी आवृत्ती कोल्हापूरच्या अभिनंदन प्रकाशनाने मार्च २००९ मधे प्रसिद्ध केली.

अमुक अेक पुस्तक दुसरी आवृत्ती आहे. नव्या आवृत्तीत काही नवी भर, असेल किंवा काही भाग गाळला असेल वा काही बदल केला असेल तर तिला नवी आवृत्ती म्हणता येते. अन्यथा ते पुनर्मुद्रण ठरते. परंतु हे पुस्तक तसे नाही.

कालिदास मराठे यांच्या या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीत तीन नवीन प्रकरणांची भर घातली आहे हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य महत्त्वाचे आहे.

मराठे प्रतिष्ठान द्वारा श्री. कालिदास मराठे यांचे अभिनंदन.

ज्यांना या पुस्तकाचा लाभ घ्यायचा असेल त्यांच्यासाठी लेखकाचा पत्ता व दूरध्वनी देत आहे.

श्री. कालिदास बाळकृष्ण मराठे

श्री.२१०, ढवळी, पो. कावळी,

तालुका फोंडा, गोवा - ७०३४०१.

मधुरध्वनी - ०८३२-२३१३८०५.

✦✦✦

महाराष्ट्रीय लोकांमध्ये आणि विशेषत:
समस्त मराठे कुटुंबियांमध्ये बांधकाम क्षेत्रामधील
एकमेव विश्वसनीय नाव

## निर्माण ग्रुप ऑफ कंपनीज्

संचालक - श्री. अजित श्रीराम मराठे



**नेरळ स्टेशनपासून फक्त १ कि.मी. अंतरावर**

## उल्हास नदीकिनारी वसलेली बंगलो स्कीम

**आमचे अन्य प्रोजेक्टस्**

- निर्माण माथेरान व्हॅली नेरळ - बंगलो स्कीम
- निर्माण नगरी नेरळ - मिनी टाऊनशिप
- ऋतुनिर्माण नेरळ - बंगलो स्कीम
- खंडाळा - निर्माण हायलॅन्ड बंगलो स्कीम
- मधुसुमित्रा निर्माण - गोरेगाव-माणगांव (मुंबई-गोवा महामार्ग) - अपार्टमेंटस् स्कीम
- निर्माण लेक व्ह्यू - गोरेगांव-माणगांव (मुंबई-गोवा महामार्ग) - अपार्टमेंटस् स्कीम

**आमचे मुंबईतील प्रोजेक्टस्**

- महालक्ष्मी,
- जोगेश्वरी,
- गोरेगाव,
- मालाड,
- कांदिवली,
- विलेपार्ले (पूर्व) आणि विलेपार्ले (पश्चिम) स्टेशन समोर

हेड ऑफिस : १४, न्यायसागर अपार्टमेंट, नागरदास रोड, चिनॉय कॉलेज समोर, अंधेरी (पूर्व), मुंबई-६९
संपर्क : २६८३ ३१३१ ✦ साईट ऑफिस : नेरळ (सेंट्रल रेल्वे मुंबई-कर्जत मेन लाईन)
दूरध्वनी : ०२१४८-२३८२५१ / ०२१४८-२३६६९६


BOOK POST

**If undelivered, please return to**

**संपादिका : 'हितगुज'**
८/१३, सहकार नगर,
वडाळा,
मुंबई - ४०० ०३१


त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल: (१) sitaram_khambete@yahoo.com (२) maratheparivar@yahoo.co.in ◉ वेबसाईट: www.marathepratishthan.org